
# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय - **अमुल बनसोड** | ४ |
| २) | व्हाईस ऑफ ट्रूथ इंटरनॅशनलविषयी - **बाइरन निकोलस** | ७ |
| ३) | येशू ख्रिस्त देवाचा पूत्र - **बेसिल ओवरटन** | ९ |
| ४) | येशूसंबंधी आपण ठामपणे सांगू शकतो काय?- **जेरी बेट्स** | ११ |
| ५) | ख्रिस्ताचे अस्तित्व - **स्टीव विलियम्स** | १४ |
| ६) | येशूचे मरण आणि त्याचे जिवंत होण्याचे सामर्थ्य - **रॉन ब्रायंट** | १६ |
| ७) | अंतरिक्षाची साक्ष - **वेयन जैकसन** | १९ |
| ८) | पवित्र शास्त्राच्या अध्ययनाचे ५ प्रकार - **क्लेरेंस डिलोक, ज्युनिअर** | २१ |
| ९) | सत्याची पुष्टी झाली आणि सत्य एकदाच दिल्या गेले - **रैगी ग्यानासुंदरम** | २३ |
| १०) | त्याची इच्छा पूर्ण करण्याची गरज - **लियोन बारनस** | २६ |
| ११) | प्रकटीकरणाचे पुस्तक - **सनी डेविड** | २८ |
| १२) | पवित्र शास्त्रातील शब्दांचे ज्ञान वाढविण्याकरिता तुमच्या मदतीसाठी - **फेंटर नॉर्दन** | ३२ |
| १३) | पवित्र शास्त्रातील शब्दांच्या ज्ञानाचे उत्तर | ३४ |
| १४) | विश्वास करण्याची कारणे - **एलन ई. हायस** | ३७ |
| १५) | येशू आणि त्याचे पवित्र शास्त्र - **ग्रेडी मिलर** | ३९ |

| | | |
|---|---|---|
| १६) | फक्त एक वेळेस - **मॅल्कोम जेम्स. मेक्लॉड** | ४१ |
| १७) | येशू पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवीत होता<br>- **विलियम वुडसन** | ४२ |
| १८) | चांगले बी - **ओ.पी.बेयड** | ४४ |
| १९) | जसे आपण याला पाहतो - **जीम शीयरर** | ४९ |
| २०) | मी पाप केले आहे - **रॉन स्टफ** | ५१ |
| २१) | येशूचे ओढण्याचे सामर्थ्य - **रॉय बिसले जू** | ५३ |
| २२) | लिहिलेले आहे - **बर्ट ग्रोव्ह** | ५६ |
| २३) | सत्याचा कोण आहे ? - **जेरी जॅकिन्स** | ५८ |
| २४) | तारण पावलेले थोडे का आहेत ? - **कैनेथ मेक्लेन** | ६० |
| २५) | तारणाची साखळी - **जॉनी रामस** | ६२ |
| २६) | अरूंद मार्ग - **बॉबी डॉकरी** | ६४ |
| २७) | येशू आणि वधस्तंभ - **विलर्ड ओर्लिंस** | ६६ |
| २८) | परमेश्वराला आज्ञापालन पाहिजे - **डी.आर.बॉगस** | ७० |
| २९) | विश्वास - **हैंस जे. डेडरशेक** | ७२ |

• • •



# संपादकीय

**- अमुल बनसोड**

व्हाईस ऑफ ट्रूथ इंटरनॅशनलचे मराठी संस्करणाचा चौथा अंक प्रकाशित करतांना मला अत्यंत आनंद होत आहे, आणि मी त्यासाठी परमेश्वराला अत्यंत धन्यवाद देत आहे.

आमची फार दिवसापासून अशी इच्छा होती की सर्वसाधारण लोकांसाठी असे काही व्हावे, आणि ते आशीर्वादीत व्हावे. व्हाईस ऑफ ट्रूथ इंटरनॅशनल याचे मराठी संस्करणाची सुरूवात करण्याचे श्रेय ब्रदर जेरी बेट्रस यांना मिळते आणि याचे मराठी भाषेत उपलब्ध करण्याचे सहयोगासाठी मी त्यांची पत्नी सिस्टर पौला बेट्रस यांच्यासाठी मी देवबापाचे उपकार मानितो.

जसे की तुम्हाला पाहायला मिळेल की या पुस्तकाद्वारे पवित्रशास्त्र समजण्यासाठी सोपा आणि सहज प्रयत्न केला आहे. आमचा प्रयत्न हा आहे की याची भाषा सर्वसाधारण लोकांना समजणारी व्हावी, यासाठी

भाषेशी जुडलेला कोणताही सल्ला स्वीकारू. वेगवेगळ्या ठिकाणी राहिल्यावर प्रचारकांचे लेख या पुस्तकामध्ये प्रकाशित केले जातील, की जे विशेष शिक्षण आणि सहज, सोप्या भाषेमध्ये भरपूर राहतील. आमची अशी इच्छा आहे की, जर तुम्ही नवीन कराराप्रमाणे त्यातील शिक्षणानुसार तुम्ही येशू ख्रिस्ताला तारणारा म्हणून स्वीकार केला आहे आणि तुमच्या विश्वासाला दुसऱ्याबरोबर वाटण्यासाठी जर तुमच्याजवळ लेख, कविता आणि वचनाची काही गोष्ट असेल तर तुम्ही सरळ सरळ आम्हाला लिहून पाठवा. जसे विषय यादीनुसार तुम्ही जाणू शकता की ख्रिस्ती विश्वासाच्या प्रत्येक विषयाला स्पर्श केल्याचा प्रयत्न केला गेला आहे. जेणेकरून जे प्रभूला ओळखतात ते आपल्या विश्वासाला मजबूत करू शकतील आणि जे प्रभूबद्दल जाणून घेऊ इच्छितात त्यांना जाणून घेण्यासाठी मदत मिळावी. येशूने म्हटले की, "बी हे देवाचे वचन आहे. (लूक ८:११). आणि जर तो नवीन कराराच्या शिक्षणाप्रमाणे चालत असेल तर त्याला पुढील अंकामध्ये स्थान देण्याचा प्रयत्न केला जाईल.

आमचा विश्वास आहे की पवित्र शास्त्र देवाचे जीवंत वचन आहे. (इब्री लोकांस पत्र ४:१२). हे देवाच्या प्रेरणेने दिल्या गेलेले आहे. (पौलाचे (तिमथ्याला दुसरे पत्र ३:१६). "आणि जो कोणी ह्यात भर घालील त्याच्यावर ह्या पुस्तकात पीडा देव आणील, आणि जो कोणी ह्या संदेशाच्या पुस्तकातील वचनातून काही 'काढून टाकील' त्याचा वाटा ह्या पुस्तकात वर्णिलेल्या जीवनाच्या झाडातून व पवित्र नगरीतून देव काढून टाकील" (प्रकटीकरण २२:१८-१९). याचा अर्थ असा आहे की, जे पवित्रशास्त्र तुमच्याजवळ आहे, जे पवित्र शास्त्र माझ्याजवळ आहे त्याच्या विपरीत कोणत्याही शिक्षणाला किंवा परंपरेला स्थान दिल्या जाणार नाही. आशा आहे की, विभिन्न विषयावर,लेखामध्ये परमेश्वराच्या वचनाची गोष्ट वाचून तुम्ही जरूर

आशीर्वाद प्राप्त कराल. जर विश्वासाने पवित्र शास्त्राशी जोडल्या गेलेला प्रश्न जर तुम्हाला विचारायचा असेल तर आम्हाला लिहा, आम्ही प्रयत्न करू की त्याचे उत्तर तुम्हाला पवित्र शास्त्रातून दिल्या जाईल. सर्व करून या पुस्तकाचा उद्देश पवित्र शास्त्रातील व्यवहारिक शिक्षणाला तुमच्यापर्यंत पोहचविणे असा आहे. जसे प्रेषित पौलाने लिहून म्हटले आहे की, "प्रत्येक परमेश्वर प्रेरित शास्त्रलेख सदबोध, दोष दाखविणे, सुधारणूक, नितीशिक्षण ह्याकरिता उपयोगी आहे. ह्यासाठी की, देवाचा भक्त पूर्ण होऊन प्रत्येक चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा" (तिमथ्याला दुसरे पत्र ३:१६,१७).

हे पुस्तक तुमच्यापर्यंत काही ख्रिस्ती लोकांच्या उदारतेने दिलेल्या दानामुळे आम्ही पोहचविले आहे. हे पुस्तक पोस्टाद्वारे आपणापर्यंत पोहचविण्यासाठी रू. २५०/- चा खर्च येतो. या पुस्तकासाठी आर्थिक मदत देण्यासाठी तुम्ही संपर्क करू शकता. तुम्ही या पुस्तकाद्वारे शुभवर्तमान प्रसार करण्यासाठी आमची मदत करू शकता.

१) तुम्ही या पुस्तकाला घरातील मुख्य जागी ठेवा, अशासाठी की घरामध्ये येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना परमेश्वराचे वचन वाचण्याचा शुभप्रसंग मिळेल.

२) तुम्ही या पुस्तकाला शाळेच्या किंवा महाविद्यालयाच्या लायब्ररीमध्ये ठेवा.

३) तुम्ही या पुस्तकाला हॉस्पिटलमध्ये ठेवा. जेथे हे पुस्तक सर्वसाधारण लोकांच्या हातामध्ये पोहचेल.

४) तुम्ही ह्या पुस्तकाला ख्रिस्तीबुक स्टॉलमध्ये ठेवा.

५) तुम्ही या पुस्तकाविषयी मंडळीच्या लोकांना सांगा.

६) तुम्ही हे पुस्तक तुमच्या मित्रांना वैयक्तिक भेट म्हणून द्या.

७) तुम्ही हे पुस्तक कारागृहातील कैद्यांजवळ घेऊन जा.

८) तुम्ही हे पुस्तक अशिक्षित लोकांना वाचून दाखवा.


९) तुम्ही हे पुस्तक उपहारगृहामध्ये अथवा ऑफिसमध्ये ठेवा.

१०) तुम्ही हे पुस्तक प्रवासामध्ये वाचण्यासाठी आपल्याजवळ ठेवा.

तुम्ही ज्या ठिकाणी काम करिता तेथील लोकांना या पुस्तकाबद्दल सांगू शकता.

लक्षात ठेवा या पुस्तकाचा उद्देश सत्य अर्थात परमेश्वराच्या वचनाचा प्रसार करण्यासाठी आहे. तुमच्या योगदानाबद्दल प्रभू परमेश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो.

• • •



# व्हाईस ऑफ ट्रूथ इंटरनॅशनलविषयी

- बाइरन निकोलस

**या** नवीन पुस्तकाची सुरूवात करतेवेळी माझ्या मनात कदाचित सर्वात गंभीर गोष्ट व्हाईस ऑफ ट्रूथ इंटरनॅशनलच्या शीर्षक वचनाशी संबंधीत जुळलेली मोठी जबाबदारी आहे. कोणत्याही विषयावर सत्य सांगण्याचा प्रयत्न एक गंभीर काम आहे, परंतु परमेश्वराच्या प्रेरणेने दिल्या गेलेले वचन अर्थातच पवित्र शास्त्राच्या संबंधात हे एक फार मोठे काम आहे. याला विश्वव्यापी बनविण्याचा विचार अधिक मोठा होतो आणि आपण समजू शकता की, ही एक लहान गोष्ट नाही.

कोणीतरी म्हटले आहे की, "शाईचा एक थब लाखो लोकांचे विचार बदलू शकतो." आमच्या हृदयाची इच्छा पुष्कळांना परमेश्वर, येशू ख्रिस्त, स्वर्गनर्क आणि सार्वकालिक यावर विचार करायला भाग पाडणे ही आहे. व्हाईस ऑफ ट्रूथ इंटरनॅशनलच्या प्रत्येक अंक निसंकोचपणे शुभवर्तमानासाठी होईल. या पुस्तकासंबंधीत प्रत्येक लोकांची इच्छा आहे की सर्व लोकांना सार्वकालिक जीवनापर्यंत तारण मिळून देण्याची मदत करावी. आम्ही हे

ओझे वाहत आहेत. ज्याची गोष्ट प्रेषित पौलाने रोमकरास पत्र १:१४-१५ मध्ये लिहून केली आहे. तेथे त्याने एक जबाबदारीची गोष्ट केली आहे, जेथे त्याला वाटले की, सुवार्ता सर्व लोकांपर्यंत पोहचविली जावी. पुढील वचनात त्याने लिहिले आहे की, सुवार्ता सांगण्यासाठी तो त्यांच्याबरोबरच उत्सुक होता. त्याला काळजी होती सुवार्ता सांगण्याची. "कारण ती सुवार्ता देवाचे सामर्थ्य आहे." त्याने स्पष्ट केले की, सुवार्तेशिवाय तारण नाही. असे वाटते की पहिल्यापेक्षा लोकांची उत्सुकता परमेश्वरामध्ये आणि त्याच्या वचनामध्ये पवित्रशास्त्रात वाढलेली आहे. आम्हाला हे अंक हरवायचे नाही. आम्हाला येशू आणि त्याच्या मंडळीची अद्भूत सुवार्ता लाखो लोकांच्या आत्म्यापर्यंत पोहचविण्याची आवश्यकता आहे.

मला लेखकांच्या सुंदरशा समूहाबद्दल अभिमान वाटतो, ज्यांनी काहीच पैसे न घेता या पुस्तकामध्ये परमेश्वराच्या प्रेरणेने दिलेल्या वचनाच्या प्रेरणेने आपला समज आणि ज्ञानाला एक दुसऱ्याबरोबर वाटण्याला सहमती दिली आहे. हे ते लोक आहेत, ज्यांना खरोखर एक दुसऱ्याची काळजी आहे. ते जगामध्ये परिवर्तन आणू इच्छितात. माझे असे म्हणणे आहे की, ते आधीपासून हे काम करीत आहेत आणि या माध्यमातून ते आपली वाणी दूरपर्यंत पोहचू इच्छितात, ज्याची आम्हाला आशा आहे.

• • •

# येशू ख्रिस्त देवाचा पूत्र

- बेसिल ओवरटन



पुष्कळ लोकांचे म्हणणे आहे की, येशू चांगला मनुष्य होता, परंतु परमेश्वराचा पूत्र नव्हता. ते हे कशासाठी म्हणतात की, येशू चांगला मनुष्य होता?कारण नवीन करार त्याला चांगला मनुष्य म्हणतो. तोच नवीन करार पुन्हा पुन्हा म्हणतो की तो स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला होता, तो परमेश्वराचा पूत्र होता.

ख्रिस्ती लोक देवाचे लेकरे आहेत, क़ारण "त्याने स्वत:च्या इच्छेने आपणाला सत्यवचनाने जन्म दिला" (याकोबाचे पत्र १:१८). परंतु येशू देवाचा एकुलता एक पूत्र आहे, ज्याला त्याने पुत्र म्हटले आहे, कारण तो त्याचा एकुलता एक पूत्र होता. देवाचा पूत्र तो तेव्हा झाला जेव्हा पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने चमत्काराद्वारे मरिया त्याची आई झाली. येशू देवाचा पूत्र आहे आणि सर्व मनुष्यजातीचा तारणारा आहे. तो सर्व मनुष्य जातीसाठी रोमन वधस्तंभावर मारल्या गेला. तीन दिवसानंतर त्याच्या पित्याने आमच्या धार्मिकतेसाठी त्याला मेलेल्यातून जिवंत केले, (रोमकरास पत्र ४:२४; लूक २४:४६,४७, १ करिंथकरास पत्र १५:१-३).

याचा अर्थ असा आहे की, येशू सर्वांसाठी मरण पावला याचा अर्थ कदापि असा नाही की, सर्वांना तारण प्राप्त होईल. केवळ त्याच लोकांचे

तारण होईल, जे येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवितात. त्याच्यावर विश्वास ठेवण्याचा अर्थ असा आहे की त्या अद्‌भूत पुत्राच्या अद्‌भूत सुवार्तेवर विश्वास ठेवायला पाहिजे, याचा अर्थ असा आहे आपल्या पापासाठी पश्चात्ताप करायचा आहे,त्याच्यावरील विश्वासाबद्दल कबुली दिली पाहिजे, त्याच्या शुद्ध करणाऱ्या रक्ताच्या सामर्थ्याने आपल्याला पापांची क्षमा मिळावी म्हणून पाण्यामध्ये बुडून बाप्तिस्मा घ्यायचा आहे (वाचा योहान ८:२१-२४, रोमकरास पत्र १०:८-१०, ६:३-४, कलसैकरास पत्र ३:१२).

येशूने म्हटले, "जो विश्वास धरितो व बाप्तस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरित नाही तो शिक्षेस पात्र ठरेल"(मार्क १६:१६).

पेत्राने येशूवर विश्वास ठेवणाऱ्यांना म्हटले "पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येकजण येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घ्या म्हणजे तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल" (प्रेषितांची कृत्ये २:३८).

असे करणाऱ्यांना येशू आपल्या मंडळीत सहभागी करितो "तेव्हा त्यांनी त्याच्या संदेशाचा स्वीकार केला, त्यांचा बाप्तिस्मा झाला; आणि त्या दिवशी त्यांच्यात सुमारे तीन हजार माणसांची भर पडली" (प्रेषितांची कृत्ये २:४१,४७).

जर तुम्हाला असे करण्यासाठी मदत पाहिजे असल्यास तुमच्या जवळच्या ख्रिस्ताच्या मंडळीचे प्रचारक किंवा आमच्याशी संपर्क करा.

• • •

# येशूसंबंधी आपण ठामपणे सांगू शकतो काय?

- जेरी बेट्स

शुभवर्तमानाचे चारही वृत्तांत काही विशेष उद्देशाने लिहिलेले आहेत. मत्तयाचे वृत्तांत त्याचे यहुदिया मध्ये राहतेवेळेस लिहिल्या गेले आहे, रोमी लोकांना शुभवर्तमानाचे वृत्तांत लिहित असतांना मार्क रोममध्ये राहत असावा. त्याचा उद्देश येशूला परमेश्वराचा पुत्र आणि जगाचा तारणारा म्हणून दाखविण्याचा होता.

विश्वव्यापी जगासाठी शुभवर्तमानाचे वृत्तांत लिहितांना लुक युनानमध्ये होता. विद्वान लोक म्हणतात की, शुभवर्तमान लिहिण्याची त्याची वृत्तांची भाषा युनानी आहे.

काही वर्षापासून येशूबद्दल वादविवाद फार प्रमाणात वाढलेले आहे. हे परमेश्वराच्या पुत्राच्या रूपात येशूच्या वाढलेल्या प्रभावाच्या कारणाने आहे. सुखवादी लोक आजच्यासाठी जगत आहेत आणि स्वत:च्या शैलीला प्रभावित ठरवित आहेत. विकासवादी लोक सृष्टीकर्त्याला काढून टाकत आहेत आणि जीवनाला एक दुर्घटना दाखवित आहेत. लूक कृत शुभवर्तमान आम्हाला येशूख्रिस्ताची ऐतिहासिक मान्यतेबद्दल अभिवचन देत आहे.

येशूच्या शिक्षणाला येशूपासून अलग करायची कोणतीही पद्धत नाही.

लूकबद्दल ज्या गोष्टीची आम्हाला माहिती होते, त्याकडून आम्हाला येशूबद्दल ठामपणे समजण्याची रीत मिळते.

दुसऱ्या पिढीचा ख्रिस्ती होण्याच्या कारणाने त्याने येशूला स्वत: कधी पाहिले नव्हते, परंतु त्याने ज्या गोष्टीबद्दल ऐकले होते, त्याबद्दल त्याने विश्वासाने शोध अवश्य केला.

तो एक अन्य जातीचा होता, त्याच्यामध्ये स्वाभाविक रूपात यहुदियाबद्दल विरोध असेल.

लुक एक वैद्य होता. ज्याने प्रेषित पौलाची सेवा केली, त्या वेळचे औषधे आजच्या सारखी स्टॅण्डर्डच्या अनुसार नव्हती. त्यांना वस्तूंच्या प्रति सावधान राहायला शिकविल्या जात होते. त्याने वैद्यच्या रूपात जे काही त्याने पाहिले होते, त्याच्या तर्कसंगतीचा आणि स्वाभाविक व्याख्याचा शोध लावला होता आणि एक मनाला आवडणारी गोष्ट आहे, की एका वैद्याच्याद्वारे अलौकिक जन्माची गोष्ट सांगितल्या गेली आहे.

लुक अवश्य एक एक साक्षीदाराशी बोलला असेल, आणि तेव्हाच खऱ्या खऱ्या गोष्टी लिहिल्या गेल्या, परंतु सर्व महत्वपूर्ण सुवार्तेचे आपले वृत्तांत लिहिण्यासाठी दैवी प्रकाशनाची प्रेरणा होती.

लुकाच्या लिहिण्याचा उद्देश येशूच्या निश्चियीयाला जोडतो. त्याने त्याच्या वैयक्तिक लाभासाठी लिहिलेले नाही, जर लिहिले असते तर त्यामध्ये संशय असता.

त्याने थियफीलाला लिहिले, जो एक रोमी अधिकारी होता. येशूच्या जीवनाच्या वृत्ताबद्दल क्रमवारपणे त्याला सांगू इच्छित होता.

लुकाच्या शुभवर्तमानाचे वृत्तांत वाचून आम्ही येशू हा देवाचा पूत्र आहे म्हणून सुनिश्चित होऊ शकतो. आम्हाला येशुला प्रभू आणि तारणारा म्हणून स्वीकारायची गरज आहे. केवळ येशू एकच आहे, ज्याला आमच्या जीवनावर अधिकार आहे.

तुम्ही तुमच्या जीवनावर त्याच्या हक्काचा विचार केला आहे ?

आम्हाला येशूला परमेश्वराचा पुत्राच्या रूपात स्वीकार करायला आणि पापांच्या क्षमेसाठी पाण्यामध्ये बाप्तिस्मा घेण्याची गरज आहे.

ख्रिस्तीपणा विचाराच्या आधारावर एखाद्या धर्म नाही. तर हा येशू नासोरी यांच्या ऐतिहासिक घटनांवर आधारित धर्म आहे. परमेश्वराचा एकुलता एक पूत्र तोच आहे.

• • •

ज्या गोष्टीसंबंधाने आपल्यांमध्ये पूर्ण खात्री झाली आहे, त्या गोष्टी आरंभापासून प्रत्यक्ष पाहणारे लोक व वचनाचे सेवक यांनी आम्हास सांगून ठेविलेला वृत्तांत लिहून काढण्याचे काम पुष्कळांनी हाती घेतले आहे, ह्यास्तव थिलफील महाराज, मलाही वाटले की, सर्व गोष्टींचा मूळापासून नीट शोध केल्यामुळे मी त्या आपल्याला अनुक्रमाने लिहाव्या, ह्यासाठी की ज्या वचनाचे शिक्षण आपल्याला देण्यात आले आहे. त्यांचा निश्चितपणा आपल्या लक्षात यावा लूक १:१-४.



# ख्रिस्ताचे अस्तित्व

- स्टीव विलियम्स्

ख्रिस्ती लोकांचा विश्वास आहे की, मनुष्य बनून जगात दैवीरूपामध्ये येशू सार्वकालिकतेत होता. येशूसाठी या मोठ्या दाव्यावर वचनातून दाखविण्यासाठी मोठे तर्क दिल्या जात आहे.

१) येशू ख्रिस्त, बाप्तिस्मा देणाऱ्या योहानाच्या जन्मापासून सहा महिन्यानंतर जन्मल्यानंतर सुद्धा त्याच्यापेक्षा मोठा होता (योहान १:३०).

२) येशू ख्रिस्त दाविदाची संतान असून, दाविदापेक्षा मोठा होता, यासाठी दाविदाने त्याला प्रभू म्हटले (मत्तय २२:४१-४५).

३) येशू ख्रिस्त अब्राहामाची संतान असून अब्राहामाच्या आधी होता (योहान ८:५८).

४) पवित्र शास्त्रात परमेश्वराने आपल्या पुत्राला "पाठविले" म्हणण्याची ही सूचना आहे की, येशू या पृथ्वीवरील आपल्या जीवनाच्या पूर्वी होता (योहान ६:४४, गलतीकरास पत्र ४:४, १ ले योहानाचे पत्र ४:९)

५) हे वचन की येशू, "परमेश्वरापासून आला" किंवा "स्वर्गातून उतरला" त्याच्या पहिले असण्याची सूचना देत आहे. (योहान ३:१३, ६:३२, ४२, ५०-५१, १३:३, १ ले करिंथकरास पत्र १५:४७).

६) पवित्र शास्त्रातील ते वचने त्या स्थितीचे वर्णन करतात, ज्यामध्ये येशू पूर्वी होता, पृथ्वीवरील त्याच्या अस्तित्वाच्या आधी आणि वेगळा होता, हे देखील त्याच्या पूर्व अस्तित्वाचा इशारा होता. येशू "धनवान" होता, परंतु "दरिद्री" झाला (२ रे करिंथकरास पत्र ८:९). "तो देवाच्या स्वरूपाचा असूनही दासाचे स्वरूप धारण केले" (फिलिप्पैकरास पत्र २:६,७).

७) सर्व काही त्याच्याद्वारे झाले आणि जे काही झाले ते त्याच्यावाचून झाले नाही (योहान १:३; कलस्सैकरास पत्र १:१६; इब्रीलोकास पत्र १:२). तो सर्व वस्तूमध्ये प्रथम होता (कलस्सैकरास पत्र १:१७). जग होण्यापूर्वी देवाच्या उपस्थितीत होता (योहान १७:५). यासाठी येशूला अल्फा म्हटलेले आहे (प्रकटीकरण १:१७, ३:१४, २१:५, २२:१३). अल्फा युनानी वर्णमालेचे पहिले अक्षर आहे. अर्थातच सर्व वस्तुमध्ये प्रथम आहे आणि पित्याबरोबर "अनादि आहे" उत्तम आहे. "खरोखर प्रारंभी शब्द (ख्रिस्त) होता आणि शब्द देवासह होता आणि शब्द देव होत" (योहान १:१).

• • •

# येशूचे मरण आणि त्याचे जिवंत होण्याचे सामर्थ्य

**- रॉन ब्रायंट**

येशूचे मरण आणि लोकांच्या पापामध्ये एक वास्तविक संबंध आहे, जो आमच्या समजण्यापलीकडे आहे. जुन्या करारामध्ये या गोष्टीवर जोर दिला गेला आहे (वाचा यशया ५३:४-१२). आणि सुवार्तेच्या संदेशा सोबत मेळ खातो (१ ले करिंथकरास पत्र १५:१-४). येशू आमच्या पापासाठी मरण पावला (मुख्यत: आमच्या पापांमुळे) हे काही मनघडत नाही, परंतु एक ऐतिहासिक तथ्याची स्पष्ट घोषणा आहे. ही गोष्ट घडलेली आणि अशी ऐतिहासिक तथ्य आहे की जिचा नकार करू शकत नाही. पवित्र शास्त्रामध्ये त्याची भविष्यवाणी केली होती. (लूक २२:३७;२४:२५-२७,४४-४६,प्रेषितांची कृत्ये २:२५-२७; ३:३५; १३:३४-३५; १७:३; १८:२८). आमच्या पापासाठी येशूच्या मरणाचा संबंध व्यापक रूपाने त्याच्या जिवंत होण्याच्या सामर्थ्यात आहे. मरण आणि पुरल्या जाण्यामध्ये आमच्यासाठी खाली येऊन आमच्या पापांना धुवून, आमच्या आवश्यकतेला त्याने पूर्ण केले आहे. त्याच्या जिवंत होण्याने अर्थात पुनरूत्थानामध्ये त्याने संभव बनविले. "एकदाच



सर्वांसाठी''पापांच्या कर्जाच्या फेड करून वधस्तंभावर मरण पावला. तो मरणातून जिवंत झाला आणि आजही जिवंत आहे. त्याने त्याच्या मरणाने पापावर विजय मिळविला आणि जिवंत होण्यामध्ये पापावर विजय मिळविला आहे. येशू मरणातून जिवंत झाला आहे; ही ऐतिहासिक गोष्ट आहे. जिवंत होण्यामध्ये येशू सर्वप्रथम आणि सर्वोत्तम एक उदाहरण आहे. ही गोष्ट खरी आहे पक्की आहे की जर येशू जिवंत झाला आहे तर दुसरेही होऊ शकतात. सत्यामध्ये जेव्हा मनुष्यजाती संबंधाने विचार केल्यावर ही गोष्ट ठाम होते की दुसरेही जिवंत होतील. वधस्तंभावरील येशूचे मरण आणि कबरेमधून जिवंत होण्याच्या रूपात नव्हे तर त्याच्या दैवी हे सामर्थ्यामध्ये पाहायला पाहिजे. म्हणजे विश्वास करणाऱ्यांनी व्यक्तिगत तारण आणि व्यक्तिगत पुनरूत्थानाच्या रूपामध्ये पाहिले पाहिजे. त्याचे जिवंत होणे त्याचे सर्व दावे पक्के करतात, आणि त्याच्या वचनाच्या अधिकाराची पुष्टी करतात आणि त्या सर्वाचे अनुमोदन आहे की ज्याची त्याने प्रतिज्ञा केली आहे. त्याने आपल्यासाठी कबरेच्या पलीकडे एक जीवन ठेवलेले आहे. कारण तो स्वत: ते जीवन देणारा आहे (रोमकरास पत्र ५:१-११, फिलिप्पैकरास पत्र ३:१०, कलस्सैकरास पत्र ३:१ वरून). सुवार्ता हीच आहे की ''येशू आमच्या पापासाठी मारल्या गेला, पुरल्या गेला आणि तिसऱ्या दिवशी मरणातून जिवंत झाला'' आणि हे सर्व पवित्रशास्त्रातील भविष्यवाणीमध्ये दाखविलेले आहे.

• • •

## साक्ष

काय हे आश्चर्य नाही की, प्रत्येक दिवशी त्या तारखेला मानून त्यामध्ये येशूचे अस्तित्व आणि त्याच्या श्रेष्ठत्वाची स्तुती करतो.

परमेश्वराच्या सामर्थ्याशिवाय, हे कसे होऊ शकते की ज्याने इतका काही दावा केला आहे आणि त्याच्या ह्या दाव्याच्या कारणाने इतकी घृणा केली गेली की त्याला दोन हजार वर्षापूर्वी वधस्तंभावर चढविल्या गेले होते, त्यानेच आज जगावर एवढा विजय मिळविला आहे की आम्ही काहीही करू त्या घटनेला त्याच्या जन्म तारखेद्वारेच दाखविल्या जाते.

बैटी बर्टन चोट

• • •



# अंतरिक्षाची साक्ष

**- वेयन जैकसन**

**फा**र पूर्वी परमेश्वराची प्रेरणा प्राप्त झालेल्या इब्री मेंढपाळाने लिहिले होते, "आकाश दवाचा महिमा वर्णिते; अंतरिक्ष त्याची हस्तकृती दर्शविते" (स्तोत्रसंहिता १९:१). आपल्या डोक्यावरील अंतरिक्षाबद्दल विचार केल्यावर कितीतरी तथ्य त्याच्या दैवी पणाची साक्ष देतात.

१९६९ या साली जेव्हा वैज्ञानिक लोकांनी चंद्रावर एक अंतरिक्ष यान पाठविले होते तेव्हा त्यांना माहित होते तीन दिवसाच्या या प्रवासामध्ये चंद्र १,६५,००० मैलापेक्षा पुढे जाईल. आपल्या योग्य ठिकाणी जाण्यासाठी किंवा पोहचण्यासाठी अंतरिक्ष यानाला चंद्राच्या दिशेने पुष्कळ पुढे सोडण्याची आवश्यकता होती. अंतरिक्षाच्या गणितीय विरोधाभासाने त्यांच्या लक्षामध्ये त्याला उतरण्यासाठी संभव केले. वैज्ञानिकांना माहिती होती की यान सोडल्यानंतर तीन दिवसांनी चंद्र कोठे असेल. पवित्र शास्त्र जेव्हा अंतरिक्षाच्या "नियमांचे" संकेत देते तर हे त्याला असेच म्हणत नाही (यिर्मया ३१:३५). दुसरे हे की जगाची विशालता या निर्माण करणाऱ्याच्या सामर्थ्याचा इशारा


देत आहे. अंदाज लावण्यात आला आहे की आपले जग सुमारे २ अरब प्रकाश वर्षापर्यंत पसरलेले आहे. ही ती गती आहे जी २,९७,६०० कि.मी. प्रति सेकंदांच्या वेगाने २ अरब वर्षामध्ये पूर्ण केली जावू शकते. निसंशय हा केवळ अंदाज आहे, कारण कोणीही जगाचे वास्तविक मोजमाप केलेले नाही, किंवा याच्या सीमांना, दिशांना समजलेले नाही. इतके विशाल जग निर्माण करणारा कसा असायला पाहिजे होता? खरोखर तो सर्व समर्थ देव आहे (उत्पत्ती १७:१).

तिसरी गोष्ट ही आहे की जगाच्या निर्माण करणाऱ्याच्या महान बुद्धीला दर्शविते. खगोलशास्त्री बाहेरील अंतरिक्षांचे जितके अध्ययन करतात तेव्हाच त्यांना समजते की, त्यांना किती कमी ज्ञान आहे. जगाची आरंभिक सिद्धांते प्रत्येक दिवशी बदलत आहे. फार वर्षापासूनच्या अभ्यासानंतर, अध्ययनानंतर मनुय जगाच्या रहस्याबद्दल तेवढाच समजू शकला जसे आरंभ करण्याच्या समयी समजत होता. जसे की पौल असे म्हणतो की, "अहाहा, देवाच्या बुद्धीची व ज्ञानाची संपत्ती किती अगाध आहे! त्याचे निर्णय किती गहन आणि त्याचे मार्ग किती अगम्य आहेत" (रोमकरास पत्र ११:३३).

• • •

# पवित्र शास्त्राच्या अध्ययनाचे ५ प्रकार

**- क्लेरेंस डिलोक, ज्युनिअर**



**आ**म्हाला पवित्र शास्त्राच्या विद्यार्थ्यांची आणखी आवश्यकता आहे. आम्हाला पवित्र शास्त्राच्या अत्यंत कुशल विद्यार्थ्यांची आवश्यकता आहे. मंडळी ही पवित्र शास्त्राच्या ज्ञानाच्या कमतरतेमुळे दु:खी आहे. मंडळीतील वडिल आणि सेवक यांना पवित्र शास्त्राचे विद्यार्थी होण्याची गरज आहे. आईवडिलांना पवित्र शास्त्राचे विद्यार्थी होण्याची गरज आहे आणि आपल्या लेकरांना शिकविण्याची गरज आहे. शिकविणाऱ्यांना शिकणारे बनने गरजेचे आहे. पवित्र शास्त्राचे महान विद्यार्थी बनण्याचे पाच उपाय याप्रकारे आहेत.

१) पवित्र शास्त्र समजण्यासाठी त्याचा अभ्यास नियमित करा:

उत्पत्तीपासून प्रगटीकरणापर्यंत अभ्यास वाचन करावे. सुरूवातीपासून आरंभ करून शेवटपर्यंत जायला पाहिजे. पवित्र शास्त्र पुढे चालणारी आणि उत्साह निर्माण करते. प्रत्येक प्रकारचे ज्ञान पूर्व समज यावर आधारित आहे. सुरूवातीपासून अध्ययन केल्याने संपूर्ण एकता आणि चांगला मेळ यांची माहिती मिळते.

२) प्रसंग समजण्यासाठी पवित्र शास्त्रात युगांचा अभ्यास करा: यावरून विद्यार्थ्यांना माहीती होईल की ते कोठे आहेत. त्यासाठी सुवार्ता,

दासत्व आणि स्वतंत्रता, शब्बाथ आणि प्रभूचा दिवस यामधील अंतर करायला सोपे जाईल. अधिकतर गडबड सत्याचे वचन 'योग्यरितीने कामात न आणल्यामुळेच आहे' (तिमथ्याला २ रे पत्र २:१५).

३) उदाहरणासाठी पवित्र शास्त्राचा अभ्यास आदर्शपूर्वक करा : जुना करार रूपकांनी भरलेला आहे, त्याचे उत्तर नवीन करारात मिळते.


४) प्रेरणा मिळावी म्हणून पवित्र शास्त्राचा अभ्यास प्रार्थनापूर्वक करा: ही पद्धत विद्यार्थ्यांना देवाच्या नियमात आनंदी राहण्याच्या योग्य बनविते (स्तोत्रसंहिता १) पुस्तकात जाण्याऐवजी तो पुस्तकाला आपल्या आत जावू देतो.

५) सिद्धांतात पक्के होण्यासाठी पवित्र शास्त्राचे अध्ययन करा : "सिद्धांताचे (म्हणजे शिक्षणाचे) 'अनेक वारे' वाहत आहेत (इफिसकरास पत्र ४:१४). जर तुम्हाला सत्य आणि खऱ्या शिक्षणाची ओळख आहे, तर तुम्ही समजू शकता की बाहेर कशाची ओरड चालू आहे. जर तुम्हाला सत्य माहीत आहे तरच तुम्हाला कोणतीही चूक शोधता येईल. मी तुम्हाला पवित्र शास्त्राचा एक आदर्श विद्यार्थी बनण्याचे आव्हान देतो.

• • •

# सत्याची पुष्टी झाली आणि सत्य एकदाच दिल्या गेले

- रैगी ग्यानासुंदरम



**म**नुष्याला नेहमीच सत्याची आवड राहिलेली आहे. त्याला हेच कारण आहे की जे लोक दावा करतात की ते सत्यशोधक आहेत. सत्य काय आहे? योहान १७:१७ या वचनात येशूने म्हटले "तू त्यांना सत्यात समर्पित कर; तुझे वचन हेच सत्य आहे." स्तोत्रसंहिता १२:६ मध्ये परमेश्वराच्या वचनाच्या शुद्धतेचे वर्णन केले आहे,"परमेश्वराची वचने शुद्ध वचने आहेत, भट्टीत सात वेळा शुद्ध करून जमिनीवरील मुशीत ओतलेल्या रूप्यासारखी ती आहेत." नीतिसूत्रे ३०:५ आम्हाला शिकविते की, "ईश्वराचे प्रत्येक वचन शुद्ध आहे. त्याचा आश्रय करणाऱ्याची तो ढाल आहे." परमेश्वराचे सत्य मनुष्यास सिद्ध बनवेल कारण तिमथ्याला २ रे पत्र ३:१६,१७ मध्ये आपण वाचतो की, "प्रत्येक परमेश्वर प्रेरित शास्त्रलेख सब्दोध, दोष दाखविणे, सुधारणूक, दोष दाखविणे, सुधारणूक, नितीशिक्षण ह्याकरिता उपयोगी आहे. ह्यासाठी की देवाचा भक्त पूर्ण होऊन प्रत्येक चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा." तरीही पुष्कळसे लोक दावा करतात की, त्यांना परमेश्वराकडून नवीन प्रकाशन मिळाले आहे आणि खुलेआम ते घोषणा करतात की ते भविष्यवाणी करतात. परमेश्वराचे वचन असल्या सर्व खोट्या दाव्याविरुद्ध दृढतेने उभे आहे, आणि कारण की परमेश्वराने जीवन आणि भक्ती संबंधीत

जोडलेल्या सर्व गोष्टी आम्हाला दिल्या आहेत म्हणून कोणत्याही मनुष्यासाठी त्या सत्याशिवाय जे आधीपासून परमेश्वराच्या वचनामध्ये प्रकट केल्या गेल्या आहे म्हणून कोणत्याही अन्य प्रकारच्या सत्याला प्रकट करने संभव नाही. याशिवाय परमेश्वराचे सत्य एकदाच आणि सर्वांसाठी दिल्या गेलेले आहे. यहुदा ३ मध्ये आपण वाचतोश, "प्रियजनहो आपल्या सामाईक तारणाविषयी मला मोठी ओढ लागली होती, तरी एकदाचाच पवित्र जणांच्या हवाली केलेला जो विश्वास त्याचे समर्थन करण्यासंबंधीचा बोध तुम्हास लिहून पाठविण्याचे मला अगत्य वाटले." पुढील वचनाकडून आपल्याला माहिती होते की, पमरेश्वराचे सत्य संपूर्ण आहे, ते मनुष्याला सिद्ध बनविल, याची पुष्टी झाली आहे, आणि हे ख्रिस्ती व्यक्तीला एकदाच सोपविण्यात आले आहे. यासाठी परमेश्वराचे वचन आम्हाला या गोष्टीची चेतावणी देते की त्याच्या वचनात आपण भर घालू शकत नाही किंवा त्याच्या वचनातून आपण काही काढू शकत नाही, ही चेतावनी आपल्याला पवित्रशास्त्रात वेगळ्या वेगळ्या स्थितीत मिळते.

१) पवित्र शास्त्रात सुरूवातीला अनुवाद ४:२ मध्ये आपण वाचतो की, "जी आज्ञा मी तुम्हाला देत आहे तिच्यात काही अधिक उणे करू नका. अशासाठी की तुमचा देव परमेश्वर ह्याच्या ज्या ज्या आज्ञा मी तुम्हाला देत आहे त्या तुम्ही पाळाव्यात."

२) पवित्र शास्त्रात नितीसूत्रे ३०:६ मध्ये लिहिले आहे "त्यांच्या वचनामध्ये तू काही भर घालू नको, घालशील तर तो तुझा दोष उघड करील."

३) पवित्र शास्त्रात शेवटच्या अध्यायामध्ये जावून प्रकटीकरण २२:१८-१९ मध्ये आपण वाचतो की, "ह्या पुस्तकातील संदेशवचने ऐकणाऱ्या प्रत्येकाला मी निश्चयपूर्वक सांगतो की जो कोणी ह्यात भर घालील त्याच्यावर ह्या पुस्तकात लिहिलेल्या पीडा देव आणील; आणि जो कोणी

ह्या संदेशाच्या पुस्तकातून वचनातून काही काढून टाकील त्याचा वाटा ह्या पुस्तकात वर्णिलेल्या जीवनाच्या झाडातून व पवित्र नगरीतून देव काढून टाकील" गलतीकरास पत्र १:८-९. या अध्यायामध्ये प्रेषित पौल लिहून म्हणतो की, "परंतु जी सुवार्ता आम्ही तुम्हाला सांगितली तिच्याहून निराळी सुवार्ता आम्ही सांगितली किंवा स्वर्गातून आलेल्या देवदूताने सांगितली तरी तो शापभ्रष्ट असो." आम्ही अगोदर सांगितले तसे मी आता पुन्हा सांगतो की जी तुम्ही स्वीकारली तिच्याहून निराळी सुवार्ता कोणी तुम्हास सांगितल्यास तो शापभ्रष्ट असो. फार दु:खाची गोष्ट आहे की पुष्कळसे लोक परमेश्वराच्या सत्याला नाकारतात. यिर्मयाने लिहिले आहे की, "हे परमेश्वरा, मला ठाऊक आहे की मनुष्याचा मार्ग त्याच्या हाती नाही, पावले नीट टाकणे हे चालणाऱ्या मनुष्याच्या हाती नाही" (यिर्मया १०:२३). जर मनुष्य ह्या स्थितीत नाही की तो आपल्या पावलांना चालू शकण्यासाठी, तर तो कसा चालेल? करिंथकरास दुसरे पत्र ५:१७ मध्ये आपल्याला उत्तर मिळते, "आम्ही विश्वासाने चालतो, 'डोळ्याने' दिसते, त्याप्रमाणे चालत नाही." विश्वास काय आहे? रोमकरास पत्र १०:१७ मध्ये पौल म्हणतो, "ह्याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्याद्वारे होते." तर मनुष्य कसा चालतो? परमेश्वराने सांगितलेल्या वचनाच्या रितीने. मनुष्य परमेश्वराच्या वचनाला नाकारू शकतो, परंतु खरोखर त्याला शेवटल्या दिवशी परमेश्वराच्या वचनाचा सामना करावा लागेल. "जो माझा अव्हेर करितो, व माझ्या वचनाचा स्वीकार करीत नाही. त्याचा न्याय करणारे कोणी आहे; जे वचन मी सांगितले; तेच शेवटल्या दिवशी त्याचा न्याय करील" (योहान १२:४८).

• • •

# त्याची इच्छा पूर्ण करण्याची गरज

- लियोन बारनस



तुम्हाला सत्याची खरोखरच भूक आहे काय? परमेश्वरची इच्छा समजून घेण्याची तुमची खरोखरच जिज्ञासा आहे काय? जर या प्रश्नाचे तुमचे उत्तर जर होय आहे तर फारच चांगले आहे. परंतु ह्यापेक्षाही फार आवश्यक आमच्यामध्ये प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याची तडप ठेवणे आवश्यक आहे. परंतु परमेश्वर आमच्याकडून ज्ञानासाठी ज्ञानाची इच्छा करत नाही योहान ७:१७ मध्ये येशुची बोलणे ऐका, "जो कोणी त्याच्या इच्छेप्रमाणे करावयाची मनीषा बाळगील त्याला ही शिकवण देवापासून आहे किंवा मी आपल्या मनचे बोलतो हे समजेल." परमेश्वराच्या इच्छेला समजण्याचा जर कोणता नियम असेल तर तो हाच आहे. कृपा करून लक्षात ठेवा की, त्याने जे केवळ त्याला समजून घेऊ पाहतात त्यांना काही देण्याचे सांगितले नाही. असे होऊ शकते की, आम्ही असे समजतो की, आम्ही चर्चा करून जिंकू शकू. कोणाला सांगू दाखवू की, त्यांच्यामध्ये काय चूक आहे किंवा फुशारकी मारायला किंवा शान दाखवायला आपल्या श्रेष्ठत्वावर शेखी मारू शकू. असे व्यवहार परमेश्वराला आवडत नाही. मोठी गोष्ट ही आहे की, परमेश्वराची


इच्छा पूर्ण करण्याची स्व:इच्छा असायला पहिजे. काही लोक म्हणतात की ठिक आहे, मला या गोष्टीकडून काही फरक पडत नाही की तुम्ही मला पवित्र शास्त्रातून काय दाखवत आहात, मी बदलणार नाही, माझ्या कुटुंबाचे हेच मत आहे आणि मी त्यावरच विश्वास ठेवून मरून जाईन. जेव्हा मी ही गोष्ट ऐकतो तेव्हा मी हैरान होऊन पळून जात नाही की, ते परमेश्वराच्या वचनाचे सत्य समजू शकत नाही. समज शक्तीचा संबंध बुद्धीबरोबरच हृदयाशी देखील आहे. एका गोष्टीवर लक्ष ठेवा की, परमेश्वराचे वचन एखाद्या पाटीवर ठेवलेल्या पुस्तकासारखी नाही. हे जीवनाचे पुस्तक आहे, हे जेथे आपण ठेवतो तेथे प्रत्येक दिवशी आपले जीवन बदलण्याच्या उद्देशाने दिल्या गेले आहे. लोकांद्वारे दिलेले वेगवेगळे विचार खरोखरच आश्चर्यचकीत करणारे आहेत. जेव्हा ते त्या गोष्टीला खरे ठरविण्यासाठी वाचतात, ज्या गोष्टींना ते आधीपासून मानतात. परंतु महत्त्वाची गोष्ट ही आहे की जेव्हा जीवनाची रीत शिकण्यासाठी याला पाहतो आणि माझे जीवन संपूर्णपणे त्याला देण्यासाठी तयार होतो तेव्हा परमेश्वराच्या वचनाच्या गोष्टी कितीतरी सरळ वाटतात. त्याची इच्छा पूर्ण करणाऱ्या व्यक्तीला माहीत होते की, पवित्रशास्त्र परमेश्वराकडून आहे आणि तो प्रतिदिन त्याच्या नियमानुसार जीवन जगण्याकरिता तयार होतो.

• • •

# प्रकटीकरणाचे पुस्तक

- सनी डेविड

पुष्कळशा लोकांना प्रकटीकरणाचे पुस्तक समजण्यासाठी अति कठीण आहे. या पुस्तकाची सांकेतिक किंवा प्रतिकात्मक भाषा असल्याकारणाने पुष्कळांची समजूत अशी आहे की, या पुस्तकाची भाषा समजण्यापलीकडे आहे, आणि म्हणूनच या कारणाने वाचकाद्वारे या पुस्तकाचा त्याग केला जातो. काही लोक जेव्हा हे पुस्तक वाचतात तेव्हा लक्षात ठेवत नाहीत की, हे पुस्तक कोणाकरिता लिहिण्यात आले होते आणि तो सांकेतिक संदेश कोणत्या परिस्थितीमध्ये दिल्या गेला होता. प्रकटीकरणाचे हे सांकेतिक पुस्तक त्या लोकांना समजण्यासाठी कठीण नव्हते, ज्यांना वास्तविक आरंभी याचा संदेश मिळाला होता, कारण ते या प्रतिकाच्या अर्थाला समजत होते. परंतु काही लोक या पुस्तकाला चुकीचे समजून याच्या शिक्षणाला चुकीच्या रितीने लागू करतात. प्रकटीकरण पुस्तकातून अनेक भयदायक गोष्टी दाखवतात, ज्या खऱ्या नाहीत, ज्या सत्य नाहीत आणि पुष्कळसे लोक अशा भयदायक शिक्षकांच्याद्वारे दिशाभूल केल्या जातात. पुस्तकातील पहिल्याच पानावर पाहिले असता याचा संदेश आशियातील सात मंडळयांच्या नावांवर



होता, जेथे आपल्या धर्माला मानण्यासाठी नकार देणाऱ्या ख्रिस्ती लोकांना मारल्या जात होते, हाकलून देण्यात येत होते, त्यांची संपत्ती लुटल्या जात होती. प्रकटीकरणाचा संदेश त्यांना हिंमत, साहस देण्यासाठी होता. हा संदेश केवळ सात मंडळयांसाठी नव्हता, तर सात अंकाचा उपयोग प्रकटीकरणाच्या पुस्तकामध्ये खास रितीने पूर्णतेच्या रूपाने केला आहे.

या सात मंडळ्या परमेश्वराद्वारे सर्व मंडळ्यांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवडल्या गेल्या होत्या. कारण त्या मंडळ्यामध्ये पाहिल्या गेलेली परिस्थिती ख्रिस्ताच्या प्रत्येक मंडळ्यामध्ये सर्व ठिकाणी पाहायला मिळते. परंतु हा संदेश प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक युगात परमेश्वराच्या लोकांसाठी आहे.

सम्राट डोमिशियनने पूजेचा नियम लागू केला होता. त्याने प्रत्येक ठिकाणी राहणाऱ्या लोकांना त्याची पूजा करण्यासाठी, त्याची मूर्ती पुष्कळ ठिकाणी बनविली होती. प्रत्येकांना कैसर देवता असलेल्या वेदीवर धुप जाळण्याची आवश्यकता होती. त्यांना एक प्रमाणपत्र देण्यात येत होते. प्रत्येक रोमी नागरिकाला असे करणे आणि प्रमाणपत्राला प्राप्त करणे आवश्यक होते. ही शर्थ न मानणाऱ्यांना कोणत्याही व्यक्तीला सम्राटचा विरोधी मानण्यात येत होते. आपण सहजरित्या पाहू शकतो की रोममध्ये ख्रिस्ती होणे कितीतरी कठीण असे होते आणि कितीतरी त्रासदायक होते. सम्राटच्या प्रति आपली स्वामीभक्ती आणि निष्ठा दाखवायला ख्रिस्तीलोकांना धूप जाळायला आणि हे म्हणावयाचे होते की, "कैसर प्रभू आहे" परंतु कोणीही खरा ख्रिस्ती असे कधीच करणार नव्हता. कारण त्यांचा प्रभू येशू ख्रिस्त होता आणि केवळ प्रभू येशू ख्रिस्त. त्यांनी कोणत्याही मनुष्याला प्रभूचे नाव द्यायचे नाही असे ठरविले होते (मत्तय १०:३२-३३). अशा प्रकारे ख्रिस्ती लोकांनी कैसराच्या पूजेच्या रितीला मानावयास नकार दिला. याप्रकारे

त्यांना कायदा तोडणारे म्हणून गणण्यात आले. सम्राट कैसराला मान, महिमा न दिल्या कारणाने त्यांना तुरूंगात टाकण्यात येत होते, मारहाण केली जात होती आणि त्रास देण्यात येत होता आणि पुष्कळांना जीवानिशी मारले जात होते.

प्रभू येशूने आपल्या शिष्यांना आश्वासन दिले होते, की ते मरेपर्यंत विश्वासू राहतील तर तो त्यांना जीवनाचा मुकूट देईन (प्रकटीकरण २:१०). याचा अर्थ असा की मरणही त्यांना त्याच्या मार्गातून हटवू शकत नव्हते, कारण अंतिम विजय त्याचांच होणार होता. त्यांना जीवनाचा मुकूट म्हणजेच स्वर्गात प्रभू परमेश्वराबरोबर सार्वकालिक जीवन मिळेल,"जेथे यापुढे मरण नाही, शोक रडणे व कष्ट ही नाहीत"(प्रकटीकरण २१:४). परंतु त्यांच्या शत्रूंना ठकविणाऱ्यांना 'अग्नीच्या' व 'गंधकाच्या' सरोवरात टाकण्यात येईल की तेथे त्यास रात्रंदिवस युगानुयुग पीडा भोगावी लागेल (प्रकटीकरण २०:१०,२१:८).

प्रकटीकरणाचा संदेश हाच होता, जो योहानाच्या वेळेस छळल्या जाणाऱ्या पवित्र लोकांबद्दल दाखविण्यात आला होता. प्रकटीकरण जगाच्या परिस्थितींना सार्वकालिक काळासाठी विजयी ठरविण्यासाठी योहानाच्या समयी न्यायासाठी, प्रभूच्या परत येण्याच्या समयापर्यंत येणाऱ्या प्रत्येक दिवसासाठी, ख्रिस्ती लोकांना प्रोत्साहीत करण्यासाठी पवित्र आत्म्याद्वारे योहानाला दाखविल्या गेलेली अपोकलिप्टिक सावलीची श्रृंखला आहे. संदेश हाच होता की प्रभू लवकरच त्याच्या लोकांना वाचविण्यासाठी येत आहे. यासाठी त्यामधील कोणत्याच गोष्टींना भ्यायचे नाही. प्रकटीकरणाच्या पुस्तकातील संदेशाला जर आपण खऱ्या अर्थाने समजण्याची इच्छा असेल तर ह्याला पहिल्या शतकांच्या आशिया माइनर जवळ ठेवायला आवश्यक आहे. जर हे त्या लोकांच्या कामाचे नाही, ज्यांना सर्वप्रथम लिहिले होते तर

ह्याच्या कोणत्याच व्याख्याला खरे मानले जाणार नाही; परंतु ते दु:ख सहन करत होते, त्यांना धमक्या मिळत होत्या आणि ते मरण पावत होते. त्यांना धाडस आणि अभिवचनाच्या संदेशाची गरज होती आणि प्रभूने त्यांना प्रगटीकरण दिले.

प्रकटीकरण आम्हाला सांगते की, प्रभू प्रत्येक शत्रूला हरवू शकतो. कोणीही त्याच्यासमोर टीकू शकत नाही, आणि कोणतीच वस्तू त्याच्या लोकांची इच्छा पूर्ण करण्यास थांबवू शकत नाही. नियंत्रण प्रभूच्याच हातामध्ये आहे. प्रकटीकरणाच्या पुस्तकामध्ये त्या लोकांसाठी संदेश आहे जे त्याच्या इच्छेप्रमाणे चालतात, इच्छेला मानतात आणि त्यांच्यासाठी निश्चितच नाशाचा संदेश आहे जे त्याची आज्ञा पाळीत नाहीत (प्रकटीकरण २१:१-८).

• • •

"जेथे यापुढे मरण नाही, शोक रडणे व कष्ट ही नाहीत" (प्रकटीकरण २१:४).

# पवित्र शास्त्रातील शब्दांचे ज्ञान वाढविण्याकरिता तुमच्या मदतीसाठी

- फेंटर नॉर्दर्न



तुमचा विश्वास आहे काय की, तुम्ही पवित्र शास्त्राच्या गूढ अर्थांना समजत आहा? मत्तय ५:१-१२ मधील वापरल्या गेलेल्या धन्य या शब्दाला पारखा. तुमचे उत्तर दिल्यावर त्यामधील खऱ्या पानाला उघडून त्याला मिळवा.

१) धन्य (क) प्रार्थना किंवा आशीर्वाद वचन. (ख) पवित्र बनने. (ग) प्रसन्न. (घ) सेवेसाठी अर्पिलेले.

२) दीन - (क) दीन होणे. (ख) बेघर. (ग) कामाशिवाय

३) मन - (क) श्वास किंवा हवा . (ख) स्वर्गदूत (ग) जिवंत (घ) भूत किंवा प्रकटन

४) शोक करणे - (क) आशाहीन. (ख) रडणे. (ग) सहानुभूति. (घ) फार पश्चात्ताप.

५) स्वर्गाचे राज्य (क)मनावर परमेश्वराचे शासन (ख)यरूशलेम मध्ये येशूचे शासन.(ग)यरूशलेम मध्ये स्वर्गदूतावर शासन.(घ) येदेन बाग.

६) शांती प्राप्त करणे. (क) मजबूत किंवा दृढ होणे (ख) सर्व प्रकारचे दु:ख

दूर होणे. (ग) आपल्या प्रार्थनेचे उत्तर मिळणे. (घ) मनाची शांती.

७) नम्र. (क) भित्रा. (ख) संयमामध्ये. (ग) शांत. (घ) घाबरट (घाबरलेला).

८) भुकेले व तान्हेले. (क) न्याहरीसाठी थोडी विसाव्याची इच्छा करणे. (ख) न्याहरीसाठी एक भाकरीची किंवा चहाच्या कपाची इच्छा करणे. (ग)पोटभर जेवणाची तीव्र इच्छा करणे (घ) उपासाचा अनुभव.

९) नीतिमत्व. (क) धार्मिक होणे. (ख) चांगली कामे करणे. (ग) मनुष्याबरोबर सरळ होणे. (घ) परमेश्वराबरोबर सरळ होणे.

१०) तृप्त होणे. (क) उघड्या कपारीला भरणे. (ख) फुगणे. (ग) संतुष्टजनक पूर्ती (घ) आणखी इच्छा न होणे.

११) दयाळू. (क) अभिव्यक्ती किंवा म्हणीचा एक भाग. (ख) कोमल गोष्टी करणे. (ग) आवश्यकतेनुसार मित्राची मदत करणे. (घ) त्रास सहन करणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणी स्वत:ला समजणे.

१२) शुद्ध. (क) अशुद्धतेला काढणे (ख) भक्त. (ग) सत्य. (घ) पश्चातापी

१३) अंत:करण. (क) सर्व प्रकारच्या भावनांचे केंद्र. (ख) रक्ताला संचलित करणारी मांसपेशी. (ग) कोणत्याही गोष्टीचे केंद्र. (घ) वेलेन्टाईनची मूर्ती.

१४) शांती करणारे. (क) जगा आणि जगू द्या. (ख) शांत लोकांवर प्रीती करा. (ग) बंदूक सोबत ठेवा. (घ) सहभागिता वाढविणे.

१५) छळ होणे. (क)चूकीच्या गोष्टी होणे. (ख) अविश्वासू होणे. (ग) जखम होण्याच्या उद्देशाने काम करणे. (घ) पोलिसाद्वारे पकडल्या जाणे.

(उत्तरे पुढील पानावर पहा.)

• • •



# पवित्र शास्त्रातील शब्दांच्या ज्ञानाचे उत्तर

१) धन्य (ग्री: Makarios) (ग) प्रसन्न. तो आनंद जो त्रास झाल्यावरही तसाच असतो (योहान १६:२२).

२) दीन (ग्री: Ptochos) अत्यंत धनहिन ५(क) दीन होणे: ह्यासाठी आपणा स्वत:ला परमेश्वराच्या हातामध्ये देणे.

३) मन (ग्री: Pneumati) वायु श्वास (जीवनाचा) सर्व प्रकारे जीवनाची विवेक भावना. (क) श्वास आणि हवा. "मनाचे दीन" जसे गर्वाच्या उलट, ह्यासाठी ज्याचे मन परमेश्वराचे वचन ऐकण्यासाठी विनम्रतापूर्वक तयार आहे, उघडे आहे.

४) शोक करणे (ग्री: Penth) (घ) फार पश्चात्ताप. आपल्या पापांसाठी पश्चात्तापी अंत:करणाने दु:ख करणे आणि जगातील पापांसाठी पूर्णपणे दु:खी होणे.

५) स्वर्गाचे राज्य (ग्री: Basileia) (क) मनावर परमेश्वराचे शासन (वाचा लूक १७:२०). सत्ता किंवा राज्य, याचा अर्थ जसे परमेश्वर स्वर्गात

राज्य करतो तसेच येशूच्या अधिन राहणारे विश्वासी ह्यांच्या मनाच्या क्षेत्रात पृथ्वीवरही करतो.

६) शांती प्राप्त करणे. (ग्री: Parakaleo) (क) मजबूत किंवा दृढ होणे. आवश्यकता असल्यास मदतीसाठी आपल्याजवळ बोलाविणे एका सहाय्यकर्त्याच्या रूपामध्ये (योहानाचे १ ले पत्र २:१). येशू सैतानाच्या आरोपाच्या विरूद्ध आपली सहाय्यता करण्यासाठी तयार आहे.

७) नम्र.(ग्री:Praus) (ख) संयमामध्ये ज्याने आपल्या इच्छेला परमेश्वरापुढे सोपविले आहे.

८) भुकेले व तान्हेले. (ग्री: Peinao, dipsao) (ग) जेवणाची तीव्र इच्छा. संदर्भात परमेश्वराच्या सर्व धार्मिकतेच्या मेजवाणीची लालसा. वाक्याचा युनानी काळ पूर्ण धार्मिकतेच्या इच्छेचा संकेत इशारा देत आहे की, परमेश्वराच्या आत्मिक भाकरीशिवाय काहीच नाही.

९) नीतिमत्व. (ग्री: diakaisune) (घ) परमेश्वराबरोबर सरळ असणे. उत्पत्ती १५:६ मध्ये अब्राहामाच्या आज्ञाधारक विश्वासाद्वारे आढळणारी स्थिती (रोमकरास पत्र ५:१).

१०) तृप्त होणे. (यू: chortazo) (ग) संतुष्टजनक आलेली पूर्ती, भरपूररित्या पूर्ती करेणे.

११) दयाळू. (यू: eleos) (घ) त्रास सहन करणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणी स्वत:ला समजणे आणि त्याच दु:खात सहभागी झाल्याबद्दल सहाय्यसाठी मदतीसाठी हात पुढे करणे.

१२) शुद्ध. (यू: Katharas) (क) जसे किमती धातूपासून मळ काढल्या जातो, जसे काही सर्व प्रकारच्या अशुद्धतेला काढून टाकणे, याप्रकारे मनातून सर्व प्रकारचे पाप काढून टाकणे. कोणत्यांच प्रकारच्या अशुद्धतेला

न ठेवणे आणि याप्रकारे भक्ती, उपासना आणि सेवेसाठी परमेश्वराला ग्रहण करण्यासाठी योग्य बनणे.

१३) अंत:करण. (ग्री: Kardia) (क) सर्व प्रकारच्या भावनांच्या केंद्राचे स्थान. या संदर्भात मांस असलेले हृदय नाही, येथे मानसिक शक्तीचे केंद्र आहे. जेथे योग्य उद्देशाच्या आधारावर योग्य निर्णय घेतले जातात.

१४) शांति करणारे. (ग्री: Eireneu) (घ) सहभागिता वाढविणे. केवळ शांतीप्रिय नाही तर जेथे भांडण आहे तेथे समेट करायचा प्रयत्न करणे.

१५) छळ होणे. (ग्री: Diako) (ग) जखम होण्याच्या उद्देशाने काम करणे.

• • •


## पवित्रशास्त्राच्या अध्ययन वर्गामध्ये उपस्थित राहण्याकरिता पाच उत्तम कारणे

१) दैवीपणाच्या तत्त्वानुसार
२) शैक्षणिक तत्त्वानुसार
३) सामाजिक तत्त्वानुसार
४) व्यक्तिमत्व तत्त्वानुसार
५) चारित्र्य तत्त्वानुसार

# विश्वास करण्याची कारणे

- एलन ई. हायर्स

आम्हातील कोणालाही केवळ हे समजण्याची आवश्यकता नाही की काय आम्ही विश्वास करतो, परंतु आम्हाला हे पण समजण्याची गरज आहे की, आम्ही यामध्ये विश्वास कशासाठी करतो. विश्वास फक्त मनाचा विचार किंवा अनुमान नाही. हा प्रमाणावर आधारित भरोसा आहे.



पेत्राने समजाविले होते की "तर ख्रिस्त 'प्रभू'याला आपल्या अंत:करणात 'पवित्र माना' आणि तुम्हामध्ये जी आशा आहे तिची विचारपूस करणाऱ्या प्रत्येक इसमास उत्तर देण्यास नेहमी सिद्ध असा, तरी ते सौम्यतेने व भिडेने द्या (पेत्राचे पहिले पत्र ३:१५). आम्हाला आपल्या आशेच्या कारणाची माहिती असायला पाहिजे. आम्हाला दुसऱ्यांना आपल्या विश्वासाचे कारण दाखविण्यासाठी उत्तर तयार ठेवायला पाहिजे. जितके निर्णायक आम्हासाठी परमेश्वरामध्ये येशू आणि परमेश्वराच्या वचनाच्या रूपामध्ये पवित्र शास्त्रावर विश्वास करायचा आहे, तितकेच महत्वपूर्वक आमच्यासाठी समजणे महत्वाचे आहे,आणि दुसऱ्यांना सांगणे जरूरीचे आहे की आम्ही विश्वास का करितो.

ख्रिस्ती जीवनाचा आधार शिक्षण आहे. येशूने आम्हाला प्रत्येक व्यक्तींना सुवार्ता सांगण्यास सांगितले आहे (मार्क १६:१५ख१६). पौलाने म्हटले आहे, "ज्या गोष्टी तू पुष्कळ साक्षांसमोर मजपासून ऐकल्या त्या इतरांना शिकविण्यास योग्य अशा विश्वासू मनुष्यास सोपून दे" (पौलाचे तिमथ्याला दुसरे पत्र २:२). ही तिच प्रक्रिया आहे, जिच्याद्वारे सत्य एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहचविल्या जाते. ज्यामध्ये योग्य विश्वासू लोक दुसऱ्यांनाही तो संदेश आजही पोहचवत आहे. पुष्कळसे लोक विचार व्यक्त करतात, परंतु सिद्धांताच्या आधारावर वास्तविक विश्वासात थोडे आहेत, ज्यांना स्पष्ट सांगू शकू आणि समजून सांगून शकू. प्रामाणिक अध्ययन आणि समज याची आवश्यकता जितकी आज आहे तितकी कदाचित पहिले असेल.


परमेश्वराच्या वचनाचे अध्ययन आत्म्याचे भोजन आहे. आत्मिक सत्वाशिवाय आपण विश्वास करू शकत नाही. येशूने म्हटले, "जे धार्मिकतेचे भूकेले व तान्हेले ते धन्य, कारण ते तृप्त होती" (मत्तय ५:६). पेत्राने आमच्याकडून आध्यात्मिक निऱ्या दुधाची इच्छा धरण्याचा आग्रह धरला आहे. (पेत्राचे पहिले पत्र २:२). इब्री ख्रिस्ती लोकांना फटकारले होते, कारण ते ज्ञानात वाढले नव्हते, आवश्यक होते की कोणीतरी त्यांना "परमेश्वराच्या वचनाचे पहिले शिक्षण द्यावे" (इब्रीलोकास पत्र ५.१२)" "याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाने होते" (रोमकरास पत्र १०:१७). जितके आपण अध्ययन करू आणि शिकू तितका आपला विश्वास वाढेल.

या आपण परमेश्वराचे लोक, येशूचे अनुयायी, आणि पुस्तकांच्या पुस्तकाचे शिष्य बनण्याचा प्रयत्न करू.

• • •

# येशू आणि त्याचे पवित्र शास्त्र

- ग्रेडी मिलर



हे आवश्यक आहे की आपण ह्यावर ध्यान देऊ की ज्या येशूने कोणत्यातरी व्यक्तीबद्दल किंवा वस्तुबद्दल म्हटले होते किंवा विचार केला होता नवीन करार आम्हाला हा निष्कर्ष काढायला स्पष्ट माहिती देतो, आपल्या तारणाऱ्याच्या मनात परमेश्वराच्या वचनाचा सन्मान आहे. धर्माच्या पुस्तकाच्या विषयावर येशूच्या काही अवलोकनावर ध्यान द्या.

येशू धर्मशास्त्राच्या अध्ययनाला आणि सुधारणेला फार आवश्यक मानीत होता. येशूने त्याच्या काळात असलेल्या धार्मिक गुरूंना दटावले, येशूने त्यास उत्तर दिले, "तुम्हास शास्त्र व देवाचे सामर्थ्य न कळल्यामुळे तुम्ही भ्रमांत पडला आहा." (मत्तय २२:२९). बारा वर्षाच्या बालवयामध्ये त्याने पवित्र पुस्तकाच्या ज्ञानाने त्याने इस्राएलच्या मोठ्या विद्वांनाना स्तब्ध केले होते(लूक २:४६,४७).

अरण्यात सैतानाचा सामना करण्यासाठी येशूने पवित्र शास्त्राचा उपयोग केला (मत्तय ४) तीनदा त्याने परीक्षेचा सामना केला आणि तीनदा येशूने घोषित केले की, "असे लिहिले आहे". येशू आपल्या विरोधकांना समाजावण्यासाठी आणि दटावण्यासाठी पवित्र शास्त्राचे उदाहरण देत होता,

तो त्याच्या आलोचकांना" तुमच्या वाचण्यात आले नाही काय? (मत्तय १२:३,५), हे तुमच्या शास्त्रात लिहिले नाही काय? (योहान १०:३४) आणि मोशेने हे का ठरविले ? (मत्तय १९:३). येशू जुन्या करारातील भविष्य वक्त्यांच्या भविष्यवाणीच्या गोष्टींना परमेश्वराच्या प्रेरणेने लिहिलेल्या मानीत होता की ज्यांचे पूर्ण होणे आवश्यक होते. जेव्हा यहुदा त्याला अटक करायला आला होता तेव्हा त्याने पेत्राला त्याची तरवार म्यानात ठेवण्याची आज्ञा दिली (मत्तय २६:५२-५४). येशूने जोर देऊन म्हटले की, आवश्यकता पडल्यावर तो स्वर्गातून स्वर्गदूतांची सेना बोलावू शकतो, परंतु पुन्हा त्याने (येशूने) विचारले "पण असे झाले तर ह्याप्रमाणे घडले पाहिजे, हे म्हणणारे शास्त्रलेख कसे पूर्ण व्हावे."

वधस्तंभावर चढविल्यावर आणि जिवंत झाल्यानंतर पृथ्वीवरून जाण्याच्या आधी येशूने आपल्या शिष्यांना आज्ञा दिली. "ह्यावर त्याने त्यास म्हटले, मी तुमच्याबरोबर असताना तुम्हास सांगितलेली माझी वचने हीच आहेत की, मोशेचे नियमशास्त्र,संदेष्टे व स्तोत्रे यात मजविषयी जे लिहिलेले आहे ते सर्व पूर्ण होणे अवश्य आहे" (लूक २४:४४). आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या दिल्या गेलेल्या जोराला मत्तय आणि लूकद्वारा लावलेल्या शब्दाला (dei) द्वारे पाहिल्या जावू शकते ज्याचा अर्थ आहे "असे लिहिले आहे की". लूक २४:४६ मध्ये या (dei) शब्दाचा मजबूतरित्या उपयोग केला गेलेला आहे. किंग जेम्समध्ये याच्या भाषांतरामध्ये याला behoved (आवश्यक होते) असे अनुवादित केल्या गेलले आहे. "या कारणाने लिहिल्या गेलेले आहे आणि या कारणाने येशू ख्रिस्ताला दु:ख सहन करणे आवश्यक होते", (behoved) आमच्या प्रभूसाठी पवित्र शास्त्राचे उंच विचार आहेतच त्यासंबंधी कोणताच संदेह होवू शकत नाही. येशूने घोषित केले आहे की, "पवित्रशास्त्राची गोष्ट असत्य, खोटी होऊ शकतच नाही" (योहान १०:३५).

ही पण महत्वपूर्ण बाब आहे की येशूने जुन्या करारातील लिखाणामध्ये त्या भागाचे समर्थन केले, ज्याला आधुनिक आलोचक आणि संदेहवादी यांनी जोमाने नाकारलेले आहे.

• • •

# फक्त एक वेळेस

**- मॅल्कोम जेम्स मेक्लॉड**

**या** जगातून मी फक्त एक वेळेस जाईल. यासाठी कोणताही चांगुलपणा, जो मी करू शकतो किंवा कोणतीही दया जी कोणत्या मानवीय जीवावर दाखवू शकतो, मला आता दाखवू द्या. मी याला टाळणे किंवा कानाडोळा करू इच्छित नाही कारण येथून मी दुसऱ्यांदा जाणार नाही.

आपल्या अंत:करणाला द्वेषापासून आणि आपल्या मनाला चिंतेपासून दूर ठेवा. साधे जीवन व्यतीत करा, अपेक्षा कमी ठेवा, गीत अधिक गात रहा, प्रार्थना निरंतर करा. आपल्या जीवनाला प्रेमाने भरा. सूर्याचा प्रकाश पसरून टाका, स्वत:ला विसरून जा. दुसऱ्यांबद्दल विचार करा. तसा व्यवहार करा की जसा तुम्ही इच्छिता, जसा तुमच्याबरोबर केल्या जावा.

संतुष्टीच्या सोन्याच्या साखळीच्या या पारखलेल्या कड्या आहेत.

• • •

# येशू पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवीत होता

- विलियम वुडसन

येशूचे उदाहरण समृद्ध करणारे अध्ययन आहे, विशेषता ख्रिस्ती लोकांकरिता. व्यवहाराबद्दल विचार केला जातो की कोणाबरोबर कसे बोलायचे, कशी गोष्ट करायची इत्यादी. परंतु येशूचे उदाहरण हे पण आहे की येशू पवित्र शास्त्राला कसे घेत होता आणि त्याचा उपयोग कसा करीत होता. या लेखामध्ये येशूच्या त्याच उदाहरणांवर ध्यान दिल्या गेले आहे. पवित्र शास्त्राला येशूच्या सन्मानाच्या पुष्कळशा गोष्टींचे अध्ययन केल्या जावू शकते. त्याने इशारा दिला आहे "लिहिले आहे" (मत्तय ४:४) येशूने परीक्षेचा सामना करण्यासाठी पवित्र शास्त्राचा उपयोग केला (मत्तय ४:४, ६, १०). त्याने जोर देऊन म्हटले की मनुष्याच्या परंपरेला पूर्ण करण्यासाठी परमेश्वराच्या आज्ञेला मोडण्यात न येवो (मार्क ७:९).

येशूने वचन आणि दाखल्याद्वारे शिकविले आहे की, पवित्र शास्त्रावर परमेश्वराच्या वचनाच्या स्वरूपात भरोसा केल्या जावा. ह्याचा आधार या तथ्यावर होता की, जे काही पवित्र शास्त्राच्या लेखकाने म्हटले, येशूने जोर दिला की ते परमेश्वराने म्हटले होते. याशिवाय येशूने म्हटले पवित्र शास्त्राच्या गोष्टी असत्य होवू शकत नाही (योहान १०:३५). येशूने इशारा दिला आहे की, जेव्हा पवित्रशास्त्राने काही गोष्टी म्हटल्या तर "ह्याप्रमाणे झाले पाहिजे" (मत्तय २६:५४).

एका लेखकाने येशूवर त्याच्या उदाहरणावर विश्वास ठेवून त्याच्या विश्वासाच्या महत्वाला फार सुंदरतेने स्पष्ट केले आहे. "आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या नजरेत संपूर्ण पवित्र शास्त्र एक तुकडा आहे. आपल्या प्रत्येक

भागात हे परमेश्वराचे वचन आहे, जे आमच्याजवळ कोणतीही चूक न करता, ती कोणतीही असो'' ते वचने दैविक शक्तीने आले आहे...

''वास्तविक येशू अर्थात तोच येशू ज्याचे आमच्याजवळ कितीतरी प्रमाण आहेत. मानत होता की पवित्रशास्त्र सत्य आहे, आणि पवित्रशास्त्र परमेश्वराचे वचन आहे. त्याने त्याच्या शिष्यांना त्यावर विश्वास ठेवण्यास आणि पवित्र शास्त्रामधील गोष्टी मानण्यासाठी आज्ञा दिली. येशूने पवित्र शास्त्राचा अपमान करणाऱ्यांना आणि जे याच्या स्पष्ट निर्देशनाची व्याख्या करून त्याचा अर्थ काढतात, त्याना दटाविले... आमच्यासाठी वास्तविक मुद्दा आहे की, येशू आमचा प्रभू आहे का? या प्रश्नाचे उत्तर दिल्यानंतरच आम्ही इतर प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी तयार होवू की पवित्र शास्त्र परमेश्वराचे वचन अर्थातच माझ्या जीवनासाठी आणि विचारासाठी अधिकारात्मक मार्गदर्शक आहे काय? या दुसऱ्या प्रश्नासाठी आमचे उत्तर प्रभू येशू ख्रिस्ताचे आज्ञाधारक आणि विश्वासू आणि उपयोगी शिष्य बनणे होय'' (केनथ कैजर).

• • •


# चांगले बी

- ओ.पी.बेयर्ड

**फा**र वर्षापूर्वी एका बातमीपत्रात एक फोटो छापला होता. यामध्ये एका मनुष्याला वटाण्याच्या वेलाजवळ उभा असलेला दाखविले होते. त्या फोटोसोबत त्या बीयाची गोष्ट होती. ज्याकडून ते वेल बनले होते. ही खूप छान गोष्ट आहे आणि यामध्ये आत्मिक 'बी'चे काही सत्यतेचे फोटो मिळतात.

काही वटाणे मिस्त्रमध्ये एका कबरेमध्ये मिळाले होते. तेथे ते वटाणे दोन हजार वर्षापासून होते. जगामध्ये पाहण्यासाठी की ते वटाणे उगवू शकतात, बियांना पेरण्यात आले. जगामध्ये कोठेच त्या बियांसारखे वटाणे उगविले जात नव्हते; परंतु जेव्हा त्या बी ला पेरले, तेव्हा त्याकडून तसेच वटाणे उगवले जसे कबरेतून मिळाले होते.

येशूने 'बी'चा दृष्टांत दिला होता, येशूने वेगळ्या वेगळ्या जमिनीमध्ये बी पेरणाऱ्या एका मनुष्याबद्दल सांगितले होते. त्यामधून काही बीं चे फळ मिळाले, परंतु काही जमिनीचे मिळाले नाही. जेथे चांगली जमीन होती, तेथे चांगले फळ आले. त्याने समजावले की बीज कोणत्या गोष्टीला दर्शविते. ''बी तर देवाचे वचन आहे.



हा दाखला असा आहे की, बी हे देवाचे वचन आहे (लूक ८:११). त्याने हे पण सांगितले आहे की वेगळ्या जमिनींचा अर्थ काय होता. चांगल्या आणि सुपीक बीसाठी त्याने म्हटले, ''चांगल्या मातीत पडलेले हे आहेत की ते वचन ऐकून सालस व चांगल्या अंत:करणात धरून ठेवतात, आणि धीराने फळ देत जातात'' (लुक ८:१५).

आज कित्येक प्रकारचे धार्मिक विश्वास आढळतात. ज्यातून प्रत्येक जण आपल्या स्वत:ला ''ख्रिस्ती'' म्हणतो. जेव्हा आपण निरनिराळे रोपटे पाहतो, तेव्हा आपण सांगू शकतो, की ते वेगवेगळ्या 'बी'चे रोपटे आहेत. जेव्हा वेगवेगळे प्रकारचे विश्वास आहेत तर लोकांना माहिती व्हायला पाहिजे की, ते निरनिराळ्या तऱ्हेच्या शिक्षणाचे फळ आहे. चांगले बी परमेश्वराचे वचन आहे, अर्थातच पवित्र शास्त्र आहे. जे शिक्षण पवित्र शास्त्रात नाही ते चुकीचे बी आहे आणि त्याचे फळ पण चुकीचे होईल.

जेव्हा लोक चांगल्या बीजाला आपल्या हृदयात ग्रहण करतील तेव्हा त्यापासून कोणते फळ निघेल? ते ख्रिस्ती लोक गणल्या जातील. यावरून ते परमेश्वर आणि त्याचा पुत्र येशू ख्रिस्तावर विश्वास करणारे लोक म्हणून आढळतील. यावरून ते परमेश्वरावर प्रेम करणारे आणि वचनाच्या शिक्षणाला मानणारे बनतील. जर ते केवळ परमेश्वराच्या वचनाचे पालन करतील, तर ते ख्रिस्ती बनतील. जसे आरंभिक ख्रिस्ती लोक होते.

ख्रिस्ती लोक ते आहेत ज्यांचा नवीन जन्म झाला आहे. येशूने निकदेमास म्हटले होते, ''मी तुला खचित खचित सांगतो, नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही''(योहान ३:३). तो कोणत्या बीजापासून जन्मला? याचे उत्तर पेत्राचे पहिले पत्र १:२३ मध्ये मिळते, ''कारण तुम्ही नाशंवत बीजापासून नव्हे, तर अविनाशी बीजापासून म्हणजे 'देवाच्या सदाजीवि व टिकणाऱ्या' वचनाच्याद्वारे पुन्हा जन्म पावलेले

आहा.

खऱ्या बीजाचा अर्थ मंडळी पण आहे. जेव्हा कोणी व्यक्ती विश्वासाने वचनाचे पालन करून त्याच्या आज्ञा पाळतो तर तो ख्रिस्ती बनतो. जेव्हा लोक असे करतात तर ते ही ख्रिस्ती बनतात आणि ख्रिस्ती लोकांच्या समुहाला मंडळी किंवा चर्च म्हणतात की मंडळी केवळ ख्रिस्ती लोकांच्या समुहाला म्हणतात जे भक्ती करतात आणि मिळून परमेश्वराची सेवा करतात. परमेश्वर मंडळीला वचनाचे निर्देश देतो. तो समजतो की, मंडळीला कसे संगठीत व्हायचे, ख्रिस्ती लोकांनी कशी भक्ती करायची व जीवन जगतांना पाहायला आवडते. ज्याप्रकारे प्रेषितांनी मंडळीला स्थापित केल्यावर त्यांना संगठित केले,

तसेच परमेश्वराची इच्छा अशी आहे की त्यांनीही मंडळीला संगठीत करावे. हे खरे आहे कारण प्रेषित लोक परमेश्वराचे दूत होते आणि त्यांना आत्म्याची प्रेरणा दिली होती.

पौलाने चेतावनी दिली होती की इतर प्रकारचे बीज पेरल्या जाईल आणि त्याचे फळ चुकीचे असेल. इफिस येथील वडिल लोकांना त्याने सांगितले, "मी गेल्यावर कळपाची दया न करणारे असे क्रूर लांडगे तुम्हामध्ये शिरतील हे मी जाणून आहे. तुम्हापैकीही काही मनुष्ये उठून शिष्यास आपल्यामागे ओढण्यासाठी विपरीत गोष्टी बोलतील" (प्रेषितांची कृत्ये २०:२९,३०).

येशूने म्हटले, "तुम्ही माझ्या वचनात राहिला तर खरोखर माझे शिष्य आहा;" (योहान ८:१३). ज्या गोष्टी येशूने पृथ्वीवर राहत असताना म्हटल्या त्या गोष्टी त्याचे वचन होते. जेव्हा तो स्वर्गात परत गेला तेव्हा त्याने प्रेषित आणि अन्य लोकांची सत्यामध्ये मार्गदर्शनासाठी पवित्र आत्म्याला पाठविले. शिकविण्यासाठी जे काही पवित्र आत्म्याने त्यांना दिले ते ही

येशूचेच वचन होते. आत्म्याला पाठविण्याच्या प्रतिज्ञेच्या बाबतीत सांगताना त्याने त्यांना म्हटले, "तो माझे गौरव करील. कारण जे माझे आहे त्यातून घेऊन ते तुम्हास विदित करील, जे काही पित्याचे आहे ते सर्व माझे आहे म्हणून मी म्हणालो की जे माझे आहे त्यातून घेऊन ते तुम्हास विदित करील (योहान १६:१४,१५;).

या आपण आपल्या अंत:करणात परमेश्वराच्या शुद्ध वचनाला जागा देवू. या त्या वचनाला शिकून आणि त्याला मानून त्यामध्ये पक्के होवू. कसे करण्याचे आपण विश्वास योग्य शिष्य बनू आणि ह्याचा अंतिम परिणाम सुटका पावलेल्या सर्व लोकांसोबत परमेश्वराच्या महिमेमध्ये अनंत जीवन असेल.

• • •

"चांगल्या मातीत पडलेले हे आहेत की ते वचन ऐकून सालस व चांगल्या अंत:करणात धरून ठेवतात, आणि धीराने फळ देत जातात" (लुक ८:१५).

## परमेश्वराचे प्रेम

मनुष्याच्या चुकीबद्दल ज्यांचा न्याय होणे आवश्यक आहे आणि ज्याच्यावर दया करता येऊ शकत नाही, अशा मनुष्याबरोबर परमेश्वराचा संपूर्ण संबंध, अयोग्य प्रजेवर ध्यान देणे, त्यांची चिंता करणे, दया करणे आणि जीवन व आनंद देणाऱ्या इच्छेसाठी आपले प्रेम देणे आणि केवळ देणे आणि केवळ देण्याचेच राहिले आहे.

पवित्र शास्त्र एक खरी प्रेम कथा आहे. पवित्र शास्त्र आमच्यासाठी एक प्रेम कहानी आहे की जे आमच्यासाठी त्याची तळमळ आणि हृदय याला दाखवते. जेव्हा आम्ही त्या पृष्ठांना वाचतो जे आपल्याला सांगतात की आपल्यासाठी आमच्या प्रेमाखातर त्याने काय केले, तर आपल्याला कळते की त्याचे प्रेम कसे महान आहे.

आणि ख्रिस्ती व्यक्तीच्या हृदयातील प्रेम तथा अन्य देवाला मानणाऱ्याच्या हृदयात आढळणाऱ्या प्रेमामध्ये हेच अंतर आहे की ख्रिस्ती व्यक्तीचे प्रेम सक्रीय आहे आणि या गोष्टीची आवड धरते की, दुसऱ्यांना आपल्यापेक्षा पहिले ठेवावे, कारण तो या प्रेमाचे उदाहरण परमेश्वरापासून शिकला आहे...

**बेट्टी बर्टन चोट**

• • •

# जसे आपण याला पाहतो

- जीम शीयरर

जसे आपण याला पाहतो की, पवित्र शास्त्र जगाचे सर्वात महत्वपूर्ण पुस्तक आहे. हे परमेश्वराचे वचन आहे (तिमथ्याला दुसरे पत्र ३:१६,१७). हे परमेश्वराचे एकमात्र वचन आहे. परमेश्वरापासून मिळालेले आणखी दुसरे कोणतेच पुस्तक नाही.

पवित्र शास्त्र आम्हाला सांगते की, परमेश्वर कसा आहे. हे आम्हाला सांगते की, येशू कसा आहे आणि पवित्र आत्मा कसा आहे. पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की, परमेश्वराबरोबर खरा संबंध कसा बनविला जाऊ शकतो. हे पुस्तक आम्हाला सांगते की तारण कसे प्राप्त करावे आणि ख्रिस्ती जीवन कसे जगायचे आहे. आम्हाला निराशा, परीक्षा, कष्ट, आजार आणि दबाव यांचा सामाना करायची पद्धत याबाबत सांगते. पवित्र शास्त्र आम्हाला सांगते की, प्रार्थना कशी करावी. हे आम्हाला मंडळी आणि मंडळीची कामे कशी करायची याबद्दल सांगते. हे आम्हाला आश्वस्त करते की, स्वर्ग आहे आणि नर्कही आहे. संक्षेपात पवित्र शास्त्र आम्हाला सर्व काही सांगते की, ज्याची आम्हाला तारण मिळण्यासाठी आणि स्वर्गात जाण्यासाठी माहिती असणे आवश्यक आहे.

प्रत्येक स्त्री / पुरुष यांच्या घरात ठेवणारी सर्वात महत्त्वाचे पुस्तक पवित्र शास्त्र आहे. आम्हाला पवित्र शास्त्र रोज वाचण्याचीच गरज आहे किंवा आम्ही हे रोज वाचले पाहिजे. आम्ही ह्यातील खजाना शोधायला पाहिजे. आम्हाला रात्रंदिवस याचे मनन करायची आवश्यकता आहे. आम्ही तुम्हातील प्रत्येकांना असे करण्याचे आव्हान करीतो. आपल्याला नक्कीच आशीर्वाद मिळेल. • • •

# एक स्वर्गीय पिता तुमच्याजवळ आहे काय?

पवित्र शास्त्र सांगते की, "देव आत्मा आहे" (योहान ४:२४). परंतु तो अवैयक्तिक शक्ती आणि उदासिन आणि निष्काळजी व्यक्ती नाही, की ज्याला मनुष्याच्या बाबतीत काहीच घेणे नाही. स्तोत्रसंहिता १०३:१३. असे म्हणते की, "जसा बाप आपल्या मुलांवर ममता करितो, तसा परमेश्वर आपले भय धरणाऱ्यांवर ममता करितो."

परमेश्वर अभिवचन देतो की, "मी त्यात निवास करीन व चालेन, मी त्यांचा देव होईन, व ते माझे लोक होतील" आणि मी तुम्हास पिता असा होईन आणि तुम्ही मला पुत्र व कन्या अशी व्हाल, हे सर्व शक्तीमान प्रभू परमेश्वराचे वचन आहे" (करिंथकरास २ रे पत्र ६:१६,१८).

पहा पित्याने आमच्यावर किती प्रेम केले आहे यासाठी की आपण परमेश्वराची संतान म्हटल्या जावू आणि आपण आहोतच (योहानाचे पहिले पत्र ३:१). मनुष्याच्या रूपात आपण परमेश्वराच्या शिक्षणाला मानून त्याची संतान बनू शकतो.

• • •

# मी पाप केले आहे

**- रॉन स्टफ**



**को**णत्याही व्यक्तिसाठी चार शब्द "मी पाप केले आहे" म्हणणे कठीण आहेत. शेकडो, पात्रांमध्ये ज्यांची नावे पवित्र शास्त्रात आढळतात असे फक्त तीन जण आहेत ज्यानी हे शब्द म्हटलेले आहेत.

काही कारणास्तव मनुष्य आपल्या चुका कबूल करण्यास मागेपुढे पाहतो परंतु जो मनुष्य परमेश्वराला ग्रहणायोग्य होऊ इच्छितो, त्याच्यासाठी हे मानणे आणि शिकणे आवश्यक आहे की त्याने पाप केले आहे. पहिले योहान १:८,९ सांगते की, "आपल्याला पाप नाही असे जर आपण म्हणतो, तर आपण स्वत:ला फसवितो व आपल्या ठायी सत्य नाही. जर आपण स्वत:ची पापे पदरी घेतो, तर तो विश्वासू व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अधर्मापासून शुद्ध करील."

व्यवहारिकदृष्ट्या या जगामध्ये पाप हा शब्द जुनाच झाला आहे. अशा लोकांना "आजारी" मार्ग चुकलेले किंवा सामाजिक बाबींचे शिकार म्हटल्या जाते. परंतु त्यांना पापी म्हटल्या जात नाही. पवित्र शास्त्र जाहीर करते की पाप एक वास्तविकता आहे आणि परमेश्वरापुढे पापी लोकांना स्वीकारण्यात येणार नाही. आपल्या पापांना मानन्याआधी आपल्याला ह्या गोष्टींची समज असणे आवश्यक आहे.

मनुष्याला फक्त हे मानण्याची गरज नाही की पाप एक वास्तविक आहे, परंतु हे पण मानायची गरज आहे की, पाप एक वैयक्तिक बाब आहे. पवित्र शास्त्र सांगते की, सर्वांनी पाप केले आहे (रोमकरास पत्र ३:२३). परंतु पुष्कळदा आपण दुसऱ्यांचे पाप तात्काळ मान्य करतो, परंतु आपल्या चुका मान्य करत नाही.

लूक १५:१७ मधील उधळ्या पूत्रासारखे एखादी व्यक्ती जोपर्यंत हे समजत नाही की पापाने त्याच्यासोबत काय केले, तोपर्यंत तो "आपल्या स्वत:मध्ये येत नाही. या पापी तरूणाला शेवटी समजले की, तो डुकरांच्या वाड्यामध्ये आहे, आणि त्या डुकराच्या वाड्यात तो त्याच्या पापामुळे आहे. जेव्हा आपल्याला समजते की पापामुळे आपण डुकरांच्या वाड्यामध्ये गेलो आहोत तेव्हाच आपण आपल्या पापाला मानून क्षमेसाठी प्रभूची आज्ञा मानण्यासाठी उत्सुक होऊ.

• • •

"आपल्याला पाप नाही असे जर आपण म्हणतो, तर आपण स्वत:ला फसवितो व आपल्या ठायी सत्य नाही. जर आपण स्वत:ची पापे पदरी घेतो, तर तो विश्वासू व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अधर्मापासून शुद्ध करील" (१ योहान १: ८,९).

# येशूचे ओढण्याचे सामर्थ्य

- रॉय बिसले जू

काही अलोचकांनी जगाला विश्वास द्यायचा प्रयत्न केला आहे की, येशू ख्रिस्त वास्तविक कधी नव्हताच किंवा झाला नाही, म्हणजे तो केवळ एकखोटेपणा आहे. परंतु यहुदी टॉलमूड मानतात की येशू वास्तविक होता. यहुदी इतिहासकार जोसिफसने याचा पुरावा दिला आहे. रोमी इतिहासकार टेसिटुस जे त्या षडयंत्रांची गोष्ट केली की ज्यामध्ये पिलातुसने त्याच्यावर दावा टाकला.

येशू काही मनघडन्त नाही. परंतु वास्तविक होता. त्याचा जन्म बेथलहेम मध्ये आणि त्याचे पालनपोषण नासरेथ मध्ये झाले. तो ऐका शताब्दीच्या फक्त एक तृतीयांश राहिला आणि हे पृथ्वीच्या एका लहानशा कोपऱ्यात घडले; तरीही त्याचे जीवन, त्याचे शिक्षण प्रत्येक युगात, सर्व लोकांपर्यंत, सर्व जागेमध्ये पोहचलो आहे. त्यामुळे त्याला इतिहासाचा मुख्य व्यक्ती बनविले आहे.

मनुष्य जातीवर येशूचा प्रभाव त्याच्याआधी किंवा नंतर होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे. साठ पिढीनंतर ही दहा करोड पेक्षा अधिक लोक त्याचे शिष्य म्हणून आणि त्याच्या नावाने ख्रिस्ती म्हणून घ्यायला पसंती दर्शवितात.

संपूर्ण पवित्र शास्त्राचे सर्वात प्रभावशाली वचनापैकी एकामध्ये योहान १२:२२ मध्ये मिळते, "मला पृथ्वीपासून उंच केले तर मी आपणाकडे सर्वास ओढीन." येशूने हे शब्द म्हटल्याबरोबर तात्काळ हे होण्यास सुरूवात झाली, त्याला वधस्तंभावर उंच उचलल्या गेले, त्याला कबरेतून उठविल्या

गेले आणि नंतर त्याला काही वेळाने स्वर्गात वर उचलल्या गेले.

त्या अनुभवावरून जे अनेक शतका शताब्दीनंतर मनुष्याला मिळाले आहे, रोमन वधस्तंभावर येशूच्या मरणाने ख्रिस्ती लाटेचा अंत व्हायला पाहिजे होता. जेव्हा त्याचा प्रमुख मरण पावला तर ह्यालाही घड्याळाच्या सुईप्रमाणे थांबायला पाहिजे होते. परंतु ख्रिस्तीपणा वेगळा होता. हा घड्याळाच्या सुईप्रमाणे थांबला नाही. वर्ष आणि शतके आली आणि गेली. परंतु हा अधिक आणि अधिक प्रभावशाली बनत गेला.

मिटने आणि विसरून जाण्याशिवाय ख्रिस्ताची जबरदस्त ओढणारी शक्ती वाढलेलीच आहे, त्या लोकांबद्दल विचार करा जे त्याच्या जीवन काळाच्या वेळेस त्याच्याकडे ओढल्या गेले होते. मरिया मग्दालिया,जक्कय, यहुदा, मत्तय, पेत्र, याकोब आणि योहान. येशूने त्या लोकांना ओढले जे आपल्या कुटुंबाला आणि आपल्या व्यवसायाला सोडून त्याच्यामागे गेले होते.

आपल्या मृत्यूनंतरही तो लोकांना ओढत राहिला. कर्नेल्य (रोमी सुबेदार) फिलिप्पी तुरूंगाधिकारी, हबशी षंढ व अशा अनेक लोकांवर ध्यान द्या.

विसाव्या शताब्दीनंतरही आज येशू लोकांना ओढीत आहे. तो वास्तविक युगांचे आकर्षण आहे. परंतु दु:खाची गोष्ट ही आहे की ओढणाऱ्या येशूचा विरोध करतात आणि पुष्कळसे लोक आहेत की ज्यांनी लोकांपुढे येशूचा स्वीकार केला नाही. ते येशूमध्ये विश्वास करणारे असू शकतात आणि मनात त्याला प्रभू म्हणून मानणारे असू शकतात. परंतु आपल्या प्रतिदिवसाच्या जीवनात त्यांनी येशूला वास्तविकपणे प्रकट केले नाही. गणनेमध्ये समाविष्ट होण्यासाठी उभे राहिले नाही.


तुम्ही येशूचे शब्द ऐकले आहेत काय "अहो, कष्टी व भाराक्रांत

जनहो, तुम्ही सर्व मजकडे या, म्हणजे मी तुम्हाला विश्रांती देईन. मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणावर घ्या व मजपासून शिका म्हणजे तुमच्या जिवास विश्रांती मिळेल" (मत्तय ११:२८,२९). तुम्ही त्याच्या हाकेकडे लक्ष दिले आहे काय? मनुष्याच्या समोर येशूचा स्वीकार केला आहे काय? तुमच्या पापासाठी तुम्ही पश्चात्ताप केला आहे काय? तुम्ही बाप्तिस्मा घेऊन प्रभूमध्ये एक झाला आहात काय?

कॅलवरीचा येशू आजही लोकांना आपल्याकडे ओढीत आहे, परंतु तो कोणावरही जबरदस्ती करत नाही. निर्णय घेणे तुमच्या हातात आहे.

• • •

"अहो, कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व मजकडे या, म्हणजे मी तुम्हाला विश्रांती देईन. मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणावर घ्या व मजपासून शिका म्हणजे तुमच्या जिवास विश्रांती मिळेल" (मत्तय ११:२८,२९).



# लिहिलेले आहे

- बर्ट ग्रोव्ह

"तर माझे नाम ज्यास दिले आहे त्या माझ्या लोकांनी दिन होऊन माझी प्रार्थना केली आणि माझ्या दर्शनाविषयी उत्सुक होऊन ते आपल्या दुष्ट मार्गापासून परावृत्त झाले तर मी स्वर्गातून त्यांची विनंती ऐकून त्यांच्या पापाची त्यास क्षमा करीन व त्यांच्या देशातून क्लेश नाहीसे करीन" (२ इतिहास ७:१४).

मंदिर पूर्ण तयार झाल्यावर राजाच्या प्रार्थनेनंतर परमेश्वराने शलमोन राजाला या गोष्टी बोलल्या. मोशे आणि येशूच्या अधिन वेगवेगळ्या प्रकारचे आज्ञापालन असून सुद्धा परमेश्वराने आपल्या लोकांकडून विश्वास आणि आज्ञापालनाची अपेक्षा नेहमी केली आहे.

दिनता आणि प्रेमपूर्वक विश्वासाने दाखविलेले आज्ञापालनाला परमेश्वराची मान्यता आणि सर्व प्रकारचे आत्मिक आशीर्वाद मिळण्याचे कारण बनल्या जातात. आत्मिक नियमासोबत मेळ झाल्याशिवाय कोणीही

आत्मिक सामर्थ्य मिळवू शकत नाही.

शापित आहे तो व्यक्ति जो ख्रिस्ती म्हणून ओळखला जातो, परंतु परमेश्वराच्या वचनाचे अध्ययन करायला आणि येशूच्या पावलावर पाऊल ठेवून चालायला नकार देतो.

• • •

"तर माझे नाम ज्यास दिले आहे त्या माझ्या लोकांनी दिन होऊन माझी प्रार्थना केली आणि माझ्या दर्शनाविषयी उत्सुक होऊन ते आपल्या दुष्ट मार्गापासून परावृत्त झाले तर मी स्वर्गातून त्यांची विनंती ऐकून त्यांच्या पापाची त्यास क्षमा करीन व त्यांच्या देशातून क्लेश नाहीसे करीन" (२ इतिहास ७:१४).

# सत्याचा कोण आहे ?

**- जेरी जॅकिन्स**

**धा**र्मिक लोकांसमोर एक मोठा मुद्दा आहे की मी सत्याला मानीत आहे काय? सत्याला माननणे आवश्यक आहे, कारण सत्यावर न चालण्याने प्रभुबरोबर संबंध तुटतो. "त्याच्याबरोबर आपली भागी आहे असे जर आपण म्हणतो आणि अंधारात चालतो तर आपण खोटे बोलतो, सत्याने वागत नाही" (योहानाचे १ ले पत्र १:६). याशिवाय हे स्पष्ट आहे की सत्य कर्माशी जोडलेले आहे आम्हाला "सत्यात वागणे" आणि 'सत्यात काम' करण्याची आवश्यकता आहे.

आम्हाला कसे माहिती होईल की आम्ही सत्याबरोबर आहोत ? पुष्कळांचे असे मत आहे की सत्य जाणून घेणे अशक्य आहे. पुष्कळांचे म्हणणे आहे की आपल्या भावनांनी सत्याला समजू शकतो किंवा ज्ञान परमेश्वराच्या सरळ हस्तक्षेपाद्वारे मिळते. प्रश्न हा आहे की मी कसे समजू शकतो की मी सत्यात आहे ?

खरे उत्तर मिळण्यासाठी आम्ही पुन्हा आपल्या प्रभूजवळ जातो."यावरून पिलात त्याला म्हणाला, तर तू राजा आहेस काय? येशूने उत्तर दिले की मी राजा आहे असे आपण म्हणता. मी यासाठी जन्मलो आहे व यासाठी जगात आलो आहे की मी सत्याविषयी साक्ष द्यावी. जो कोणी सत्याचा आहे तो माझी वाणी ऐकतो" (योहान १८:३७).

जर तुम्ही सत्यात वागत आहात तर निम्न विषयावर येशूचा आवाज ऐकाल;

१) तुम्ही बाप्तिस्म्याच्याविषयी त्याची वाणी ऐकली आहे काय? "जो

विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरित नाही तो दंडास पात्र ठरेल" (मार्क १६:१६).

२) तुम्ही आत्मा वाचविण्यासाठी त्याची वाणी ऐकली आहे काय? "त्याने त्यास म्हटले, माझ्या मागे चला म्हणजे मी तुम्हास मनुष्ये धरणारे करीन" (मत्तय ४:१९).

३) देण्यासाठी त्याची वाणी तुम्ही ऐकली आहे काय? "घेण्यापेक्षा देणे ह्यात धन्यता आहे" (प्रेषितांची कृत्ये २०:३५).


४) तुम्ही प्रार्थनेविषयी त्याची वाणी ऐकली आहे काय? "त्यांनी सर्वदा प्रार्थना करावी व थकू नये" (लूक १८:१).

५) आज्ञापालनाविषयी तुम्ही त्याची वाणी ऐकली आहे काय? "तुम्ही मला प्रभू प्रभू म्हणता, पण जे मी सांगतो ते का करीत नाही"? (लूक ६:४६). "आणि प्रभुजी, प्रभुजी असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल असे नाही, तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वर्ततो त्याचा होईल" (मत्तय ७:२१).

• • •

# तारण पावलेले थोडे का आहेत ?

**- कैनेथ मेक्लेन**



**ये**शूला विचारिल्या गेले, "प्रभूजी तारणप्राप्ती होत असलेले लोक थोडे आहेत काय? (लूक १३:२३) मत्तय ७:१३,१४; २२:१४ मध्ये येशू हे स्पष्ट करतो की, मनुष्य जातीचे अधिकाधिक लोक हरवलेले असतील. आणखी येशूने म्हटले तारण पावलेले थोडेच लोक असतील. ते थोडे लोक किती आहेत ?

योहानाने लिहिले की, "नंतर मी पाहिले तो सर्व राष्ट्रे, वंश, लोक व भाषा यापैकी कोणाच्याने मोजवला नाही असा, शुभ्र झगे परिधान केलेला व हाती झावळ्या असलेला, मोठा समुदाय राजासनासमोर व कोकऱ्यासमोर उभा असलेला माझ्या दृष्टीस पडला" (प्रकटीकरण ७:९). होय, जोपर्यंत जगाच्या संख्येची गोष्ट आहे तोपर्यंत जीवन आणि मेलेल्यातून "काही" लोकच तारण पावतील. जरी लाखो लोकांचे तारण झालेले असलो तरीही आजपर्यंत जगातील लोकांच्या तुलनेत ते "थोडकेच" होणार नाहीत काय?

काय परमेश्वराची इच्छा आहे की सर्वांचे तारण व्हावे? पेत्राचे २ रे पत्र ३:९ मध्ये आम्ही वाचतो की "कित्येक लोक ज्याला विलंब म्हणून म्हणतात, तसा विलंब प्रभू आपल्या वचनाविषयी करीत नाही, तर तो तुमचे सहन करितो, कोणाचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही, तर सर्वांनी

पश्चात्ताप करावा असा आहे." परमेश्वराची अशी इच्छा आहे की सर्वांना तारण मिळावे. प्रत्येक व्यक्तीला सुवार्ता सांगणे ही आमची जबाबदारी आहे यासाठी की त्यांना तारण मिळावे. आमचा प्रश्न आहे की तारण पावलेले "थोडे" का आहेत.

१) "तारण पावलेले थोडे आहेत कारण अनेक लोक सोपा मार्ग निवडतात, ज्यामध्ये कमी विरोध व्हावा (मत्तय ७:७, ८,१३,१४). येशू म्हणतो की आम्ही परमेश्वराची, कृपा प्राप्त करण्यासाठी, मागणे, शोधणे आणि ठोकले पाहिजे.

२) तारण पावलेले थोडे आहे कारण अनेक लोक सुवार्ता ऐकत नाही. मत्तय २२:१-१३ मध्ये येशूने हे दाखवले आहे की पुश्कळशा लोकांची मनाची इच्छा परमेश्वराच्या राज्यामध्ये होण्याऐवजी कौटुंबिक गोष्टीमध्ये अधिक आहे, हा दृष्टांत दिला. आज हा कोठवर सत्य आहे ?

३) तारण पावलेले थोडे आहेत कारण पुष्कळसे लोक वाट पाहतील तोपर्यंत वेळ झालेली असेल. लूक १३:२२-२८ मध्ये येशू म्हणतो की अनेक लोक तारण मिळविण्याचे शोधतील पण वेळ निघून गेलेली असेल. न्यायाच्या दिवशी तारणाचा शोध करणे बेकार होईल. जर मनुष्याच्या आरंभापासून न्यायाच्या दिवसापर्यंत सर्व लोकांचे तारण होऊन जाईल आणि तरीही एखाद्या सुटल्या गेला तर परमेश्वराच्या हिशोबाप्रमाणे "थोडेच" असतील. आमच्या परमेश्वराने सांगितले आहे की, "थोड्या" लोकांचे तारण होण्याचे कारण काय आहे ? जितक्या लवकर होईल तितक्या लवकर आपण तारणाचा शोध करायला पाहिजे आणि प्रभूला भेटण्यासाठी काळजीपूर्वक होऊन आपल्या मनाला तयार करावे.

• • •

# तारणाची साखळी

- जॉनी रामसे

साखळीची प्रत्येक कडी फार महत्त्वपूर्ण असते. जर एक कडी तुटेल किंवा हरवेल तर संपूर्ण साखळीच बेकार होते. पवित्र शास्त्रामध्ये या नियमाला स्पष्ट रूपात मानल्या गेले आहे. आमच्या तारणामध्ये पुष्कळशा गोष्टी आवश्यक आहेत. काही लोक म्हणतात, "ख्रिस्त तारण करतो"आणि यामध्ये काहीच शंका नाही. परंतु मित्रांनो पवित्र शास्त्रानुसार तारणाचे पुष्कळशे कारणे आहेत. उदाहरणार्थ पवित्र शास्त्रात रोमकरास पत्र ८:२४ मध्ये आपण वाचतो की "आपण आशा धरल्याने तरलो." इफिसकरास पत्र २:८.मध्ये आपण वाचतो की "तुमचे तारण कृपेनेच विश्वासाच्याद्वारे झाले आहे."

रोमकरास पत्र ५:१० मध्ये पौलाने आम्हाला सांगितले आहे की, आपल्याला तारण येशूच्या जीवनाकडून मिळते. इफिसकरास पत्र १:७ मध्ये आम्हाला वाचायला मिळते की, तारण येशूच्या रक्ताद्वारे होते. योहान ३:१६ आम्हाला सांगते की, विश्वास तारणाच्या साखळीची आणखी एक कडी आहे. करिंथकरास २ रे पत्र ७:१० मध्ये आपण वाचतो की, "दु:खी असलेले तरी सर्वदा आनंद करणारे, कफल्लक असे मानिलेले तरी सर्ववस्तुसंपन्न अशी आम्ही आपली लायकी पटवितो." पौल आणखी म्हणतो की, "जर तू आपल्या मुखाने येशू प्रभू आहे असे स्वीकारशील आणि देवाने त्याला मेलेल्यातून उठविले असा आपल्या अंत:करणात विश्वास धरशील तर तुला तारणप्राप्ती होईल" (रोमकरास पत्र १०:९-१०).

धार्मिक शिक्षण देणारा प्रत्येक व्यक्ती येथपर्यंत सहमत आहे. पवित्रशास्त्र इतके स्पष्ट आहे तर आणखी विश्वास कसा केला जावू शकतो?

परंतु आता तारणाच्या साखळीचे दोन अन्य भाग येतात पेत्राचे १ ले पत्र ३:२१ मध्ये आपण वाचतो, "त्या पाण्याचा नमुना जो बाप्तिस्मा, त्याच्या योगे देहाचा मळ दूर करणे नव्हे, तर चांगले मन राखण्याचा देवाबरोबर करार करणे होय; तो आता येशू ख्रिस्ताच्या पुन्हा उठण्याच्या द्वारे तुम्हास तारीत आहे." येशूने आणखी म्हटले की, "जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरित नाही तो दंडास, पात्र ठरेल" (मार्क १६:१६).

तारणाची आणखी एक कडी आपल्याला मत्तय १०:२२ मध्ये मिळते. येथे आपल्या प्रभूने म्हटले, "माझ्या नामामुळे सर्व लोक तुमचा द्वेष करितील; जो शेवटपर्यंत टिकेल तोच तरेल." येथे परमेश्वराच्या लेकरांमध्ये धीर असणे आवश्यक आहे, नाहीतर त्यांचा नाश होईल.

लक्षात ठेवा की तारण एक ईश्वरीय नाटक आहे. मंचावर दोन कलाकार आहेत. परमेश्वराने आपली भूमिका निभावलली आहे; दुसरी भूमिका मनुष्याची आहे. काय आम्ही आपली भूमिका निभावली आहे? तोपर्यंत ही भूमिका पूर्ण होणार नाही, जोपर्यंत आपण त्याच्या आज्ञा पाळत नाही. या गोष्टीवर ध्यान द्या की तारणाच्या साखळीची कोणतीही कडी निघायला नको.

तुम्ही साखळी तोडली आहे काय?

• • •

# अरूंद मार्ग

**- बॉबी डॉकरी**

**ये**शू प्रचार करत होता की जीवनात पसंत निवडावी लागते.

जीवनातील सर्वात वास्तववादी पसंतीमध्ये एका रूंद आणि अरूंद मार्गातून एकाला निवडणे आहे. जसे की येशूने म्हटल, "अरूंद दरवाजाने आत जा, कारण नाशाकडे जाण्याचा दरवाजा रूंद व मार्ग पसरट आहे, आणि त्यातून आत जाणारे बहुत आहेत, जीवनाकडे जाण्याचा दरवाजा अरूंद व मार्ग संकोचित आहे, आणि ज्यास तो सापडतो ते थोडके आहेत" (मत्तय ७:१३-१४). येशूने अशी बाग दाखविली नाही की शिष्य बनण्याचा मार्ग खूप सोपा आणि दु:खाशिवाय आहे. त्याने येणाऱ्या कठीण परिस्थितीबद्दल सांगितले आहे. सोपा मार्ग पण आहे, परंतु तो मरणाकडे म्हणजेच नाशाकडे आणि नेहमीसाठी परमेश्वरापासून दूर असलेला मार्ग आहे.

येशूने ख्रिस्तीत्वाला अरूंद मार्ग का सांगितले ?




१) कारण की शिष्य बनण्याच्या अटी अरूंद आणि तंग आहेत (मत्तय ७:२१, १६:२४). कोणी मनुष्य जन्मताच हिंदू, मुस्लिम, बौद्ध किंवा यहुदी असू शकतो, परंतु

जन्मताच ख्रिस्ती नाही. नवीन जन्म घेणे आवश्यक आहे (योहान ३:३,५). विचारपूर्वक निर्णय घेणे, पसंतीस निवडणे आणि प्रयत्न करणे आवश्यक आहे. येशू स्पष्ट आज्ञापालनाची मागणी करीत आहे (लूक ६:४६, इब्री लोकास पत्र ५ :८,९).

२) कारण सत्य अरूंद आहे (योहान ८:३२). सत्याला खोट्याबरोबर सहन करण्यासाठी मोठे केल्यानंतर सत्याला सत्य म्हटल्या जात नाही. सत्य इलास्टिक नाही, ज्याची लांबी प्रत्येक व्यक्तीच्या आवश्यकतेनुसार बदलून जाईल.जेव्हा गणितज्ञ एखाद्या समीकरणाला सोडवितो तर त्याचे उत्तर "गणितीय सत्य" आवश्यक रूपात अरूंद असते. जेव्हा एखादा औषधाचा निर्माता एखाद्या औषधाला तयार करतो तर त्याला एका निर्धारित फार्मुल्यात बनविल्या जाते. आपल्या स्वभावानेच सत्य प्रतिबंधक आहे. "ख्रिस्ताचे शिक्षण धरून न राहता जो पुढे पुढे जातो त्याला देव नाही; जो शिक्षण धरून राहतो त्याला पिता व पुत्रही आहे" (२ रे योहान ९).

३) कारण वधस्तंभाची शिस्त अरूंद आहे. जेव्हा गेथशेमाने बागेत येशूने प्रार्थना केली तर त्याच्यासमोर जे विकल्प होते फारच अरूदं होते. पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्याला वधस्तंभासाठी स्वत:ला देणे आवश्यक होते. ख्रिस्ती जीवन आमच्याकडूनही अनुशासित जीवन जगण्याची मागणी करते (तिताला पत्र २:१२). आम्हाला रूंद किंवा अरूंद मार्गावरून एकाला निवडावेच लागणार आहे. आपल्याला वाटेल की रूंद मार्ग सोपा आहे आणि यावर चालणे कठीण नाही आणि अरूंद मार्ग कठीण आहे परंतु अति मोठा मार्ग नाशाचा आहे, तंग मार्ग जीवन आहे.

● ● ●



# येशू आणि वधस्तंभ

- विलर्ड ओर्लिस

एका वैश्विक आधारावर हरवलेल्यांचे तारण येशू आणि वधस्तंभावर केंद्रीत होते. १९०० वर्षांपासून येशूच्या बलिदानाने मनुष्याला परमेश्वराजवळ आणले आहे. येशूला वधस्तंभावर खिळण्याच्या आधी त्याच्याबरोबर लाजीरवाणा व्यवहार केला गेला होता. तारणाऱ्याला त्याच्या शत्रूंच्याद्वारे फटके मारण्यात आले, कपडे काढण्यात आले आणि शिपायांच्याद्वारे चेष्टा केली गेली. विरोधी लोक त्याच्या तोंडावर थुंकले आणि नंतर त्याला वधस्तंभावर चढवायला घेऊन गेले. वधस्तंभावर खिळण्याबद्दल मत्तयाने लिहिले आहे, "त्याला वधस्तंभावर खिळिल्यावर चिठया टाकून त्याची वस्त्रे वाटून घेतली. नंतर त्यांनी तेथे बसून ते त्याच्यावर पहारा करीत राहिले" (मत्तय २७:३५-३६). पुष्कळ तास कष्ट, छळ सहन केल्यावर गुलगुथामध्ये मरण पावला.

**वधस्तंभ-एक प्रतिक :**

वधस्तंभ ख्रिस्ती धर्माच्या महान सत्यतेचे प्रतिक आहे. सर्वप्रथम हे

प्रतिक पापाच्या अति खोलपणाला सुचविते. पापाचे चिन्ह तुटलेली घरे, विभिन्न वर्गामध्ये आढळणारी घृणा आणि एक दुसऱ्याच्या अधिकारासाठी मनुष्याच्या तिरस्कारामध्ये पाहायला मिळते. परंतु मनुष्यासाठी खऱ्या प्रकाशात पापाच्या चित्रांना दाखविण्याचा परमेश्वराचा सर्वात मोठा प्रयत्न वधस्तंभावर चढविल्या जाणे आहे.

परमेश्वराच्या पुत्राच्या मरणला जबाबदार पाप होते. मी एकदा स्वर्गवासी एच.लियो बोल्स ह्यांना "पाप ज्याने येशूला वधस्तंभावर चढविले" बोलतांना ऐकले. त्यांनी पापाच्या अज्ञानतेपासून आरंभ केला आणि नंतर घृणा, इर्ष्या, पूर्वधारणा, खोटे बोलणे, पैशाचे लोभी आणि नैतिक कमजोरीसारख्या पापांची यादी दाखविली. नैतिक कमजोरीच्या पापाची टिप्पणी करून, बोल्सने म्हटले की, "पिलात इतका कमजोर होता की तो ते करू शकला नाही. ज्याची त्याला माहिती होती की त्याला करायला पाहिजे. तो धैर्याने कार्य करू शकला असता परंतु त्याने सन्मानाच्या आपल्या नियमांना बलिदान केले आणि नैतिक भित्रेपणाच्या रूपात काम केले.

**कृपा :**

येशूचा वधस्तंभ परमेश्वराच्या अत्याधिक कृपेचे प्रतिक आहे. वधस्तंभावर वाहिलेल्या येशूच्या रक्ताचे सामर्थ्य सर्वांसाठी आहे. न्यायाची मागणी आहे की वाईटाला दंड दिल्या जावा. परंतु येशूच्या मृत्यूद्वारे परमेश्वर पापात पडलेल्या मनुष्यावर कृपा करितो. पापी लोक दंड मिळण्याऐवजी क्षमा प्राप्त करू शकतात.

ही कथा मेदी आणि परूशी लोकांशी मिळालेली होती. मेदी आणि परूशी लोकांचे कायदे अपरिवर्तनीय होते आणि त्यांच्या शिक्षेपासून वाचल्या जावू शकत नव्हते. डोळ्याबद्दल डोळा आणि दाताचा बदला दात होता.

एका तरूणाने आपल्या मित्राचे डोळे काढले आणि कायद्यानुसार त्याच्या अपराधाचा दंड हा होता की तो तरूण आपले डोळे काढील.

अपराध्याला पेशीसाठी न्यायाधिशासमोर आणण्यात आले. या केसमध्ये न्यायाधीश अपराध्याचा पिताच होता. पित्याच्या कानात न्याय आणि दयेचा विरोधात्मक आवजा गुंजत होता. तो आपल्या पुत्रावर प्रेम करीत होता परंतु तो कागद्याचाही सन्मान करीत होता, दोषीला शिक्षा देणे आवश्यक होते, परंतु प्रेमासाठी दयेचा मार्ग काढणे आवश्यक होते.

पुष्कळ विचार केल्यावर न्यायाधिशाने आपल्या मुलास म्हटले, "तुझ्या न्यायाधीशाच्या रूपामध्ये, मला कायद्याचा दंड देणे आवश्यक आहे, तो हे मागत आहे की त्या दोन डोळ्याच्या त्या बदल्यात ज्याना तू नष्ट केले आहे तुझे दोन्ही डोळे घ्यावेत. कायद्याच्या मागणीप्रमाणे मी काही कमी करू शकत नाही. परंतु तुझा पिता असल्याकारणाने मी कायद्याच्या अटी पूर्ण करण्यासाठी तुझी मदत करायला मी माझा एक डोळा देतो."करूणेच्या शिक्षणामध्ये पौलाने म्हटले, "परंतु देव आपल्यावरच्या स्वप्रेमाचे प्रमाण हे देतो की आपण पापी असता ख्रिस्त आपणासाठी मरण पावला" (रोमकरास पत्र ५:८). वधस्तंभ मनुष्यासाठी परमेश्वराची करूणा आणि प्रेम जाहीर करते.

**तारणाचे सामर्थ्य :**

वधस्तंभ मनुष्याच्या तारणाच्या सामर्थ्याचे प्रतिक आहे. पौलाने म्हटले "कारण ज्यांचा नाश होत आहे त्यांना वधस्तंभाविषयीचे शिक्षण मूर्खपण आहे; तरी ज्यास तारण प्राप्त होत आहे अशा आपणास ते देवाचे सामर्थ्य आहे" (पौलाचे करिंथकरास १ ले पत्र १:१८). वधस्तंभावर येशूच्याद्वारे मनुष्यांची भेट परमेश्वराबरोबर केली जाते.

सूटपत्र घेतलेल्या पती पत्नीची कहानी आह, जे आपल्या मरणाला

टेकलेल्या लेकराच्या बिछान्याच्या दोन्ही बाजूला उभे होते. एका हाताने त्या लेकराने पित्याचा हात पकडलेला होता आणि दुसऱ्या हाताने त्या लेकराने आपल्या आईला घट्ट पकडले होते. लेकराच्या या स्थितीमध्ये असतांना त्याच्या लहान शरीरातून प्राण निघून गेला आणि आत्मा परमेश्वराजवळ परत निघून गेला, ज्याने त्याला दिला होता. परस्पर या प्रेमाच्या कार्याने दोन लहान हाताद्वारे त्यांना ओढून जवळ आणण्यात आले. हे पती, पत्नी पुन्हा एकत्र झाले आणि तुटलेले घर पुन्हा प्रस्थापित झाले.

गुलगुथा मध्ये परमेश्वराचा पुत्र एका हाताने स्वर्गात पोहचला आणि त्याने परमेश्वराला पकडले. दुसऱ्या हाताने तो मनुष्याच्या हृदयाला स्पर्श करण्यासाठी पृथ्वीपर्यंत पोहचला. वधस्तंभाचा येशू मनुष्याची भेट परमेश्वराबरोबर करण्यासाठी इच्छुक आहे.

ज्यावर आमचा तारणारा मरण पावला होता ते केवळ लाकडाचे तुकडे नव्हते. पुढच्या वेळेस जेव्हा तुम्ही "आहा तो प्रिय वधस्तंभाचे" गीत गाणार तेव्हा पुन्हा त्या परमेश्वराच्या कृपेवर, दयेवर आणि प्रेमावर विचार करा. योहानाने या प्रकारे संक्षिप्त केले आहे, "देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, यासाठी की जो कोणी त्यावर विश्वास ठेवितो त्याचा नाश होवू नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हाव" (योहान ३:१६).

• • •

# परमेश्वराला आज्ञापालन पाहिजे

- डी.आर.बॉगस

"परमेश्वराचा शब्द पाळल्याने जसा त्याला संतोष होतो तसा होमांनी व यज्ञानी होतो काय? पाहा यज्ञापेक्षा आज्ञा पाळणे बरे; एडक्याच्या वपेपेक्षा वचन ऐकणे बरे" (१ ले शमुवेल १५:२२).

ही गोष्ट शमुवेलाने शौलाने सांगितली जेव्हा शौल अमालेक्यांचा वध करून परतला होता. तुम्हाला आठवत असेल की, शौल राजा अगाग आणि त्याच्यासोबत चांगल्या मेंढरेबकऱ्या, गाय, बैल घेऊन आला होता. शौलाने बहाना केला होता की त्या पशुंना त्याने परमेश्वरासमोर भेट अर्पण करण्यासाठी आणल्या आहेत. तो अमालेकींच्या प्रत्येक व्यक्तींना आणि वस्तूंना नष्ट करण्याच्या परमेश्वराच्या आज्ञेला पूर्ण करू शकला नाही.

परमेश्वराचा व्यवहार आजही तसाच आहे जसा पूर्वीच्या काळात होता. कोणत्याही वस्तूपेक्षा श्रेष्ठ जे आम्हाला वाटते ते परमेश्वराला भेट केली जावू शकते. आज्ञापालन सर्वात महत्त्वपूर्ण आहे. आता आपण वेदीवर पशुंना जाळत नाही परंतु आजही आम्ही त्याच्या आज्ञेशिवाय परमेश्वराला ती भेट द्यायचा प्रयत्न करतो, ज्यांची आपण इच्छा धरतो.

आम्ही पवित्रशास्त्रातील त्या वचनांना शोधतो, जे आपल्याला पाळायला कठीन आहे आणि सहज म्हणतो की, ते आमच्यासाठी नाही. आमचे मित्र आणि प्रियजन आहेत की त्यांचे जीवन परमेश्वराच्या वचनाच्या विपरीत आहे आणि म्हणतो की परमेश्वराने त्याच्यासाठी विशेष अपवाद बनविला आहे किंवा आणखी सहज म्हणू की, आम्ही सहज जीवनासाठी परमेश्वराच्या इच्छेला जाणून घेण्यास नकार देतो आणि आज्ञा न मानण्यास

उचित ठरविण्यास म्हणतो की आम्हाला माहीतच नव्हते, आम्ही आज्ञा कशी मानू.

स्वर्गीय पित्याला आवडणाऱ्या या वस्तूंना, या गोष्टींनी मोजू शकत नाही की प्रभूच्या मंदिरात सोन्याची किंवा चांदीच्या किती वस्तू अर्पण करतात. ह्याला परमेश्वराच्या महिमेला समर्पित महान स्वर संगतीच्या संख्या किंवा सुंदरतेने मिळविल्या जात नाही. ह्याला या गोष्टींनीही मोजू शकत नाही की आराधनेला सुंदर बनविण्यासाठी आम्ही यामध्ये काय निर्णय घेतो.

परमेश्वराला प्रसन्न करणारी गोष्ट त्याच्या आज्ञा पाळण्यासाठी हृदयाने लीन होणे म्हणजे या गोष्टी म्हणायला तयार असणे की, "तुझ्या इच्छेप्रमाणे होवो" आणि मग त्या पूर्ण करायच्या आहेत. परमेश्वर त्या लोकांचा स्वीकार करतो जे परमेश्वरला हे सांगण्यासाठी हा विचारही करत नाही की ते त्याला कोणती भेट चढवतील. ते आज्ञापालनात लीन होऊन, परमेश्वराच्या अनादि वचनातून शिकून शुद्ध मनाची भेट देतात.


• • •

# विश्वास

- हँस जे. डेडरशेक

विश्वासाला इमानदारी आणि भरवश्याबरोबर जोडल्या गेले पाहिजे. पौलाने या गोष्टीची पुष्टी केली आहे की, ख्रिस्त येशूमध्ये प्रीतिच्याद्वारे कार्य करणारा जो विश्वास तो कामाचा आहे (गलतीकारास पत्र ५:६). आणि विश्वासावाचून त्याला संतोषविणे अशक्य आहे (इब्री ११:६). परंतु प्रेमाशिवाय विश्वास अस्वीकार्य आहे (करिंथकरास १ ले पत्र १३). तसा विश्वासही क्रियांवाचून निर्जीव आहे (याकोबाचे पत्र २:२५). यासाठी मनुष्यासाठी विश्वास हा स्त्रोतांचा झरा आहे. विश्वास विश्वासणाऱ्यांना ख्रिस्त येशूमध्ये वाचवितो, सुधारतो, समजावितो आणि सिद्ध करितो.

व्यक्तीचे मन परमेश्वरामध्ये विश्वासाद्वारे शुद्ध होते (प्रेषितांची कृत्ये १५:९). विश्वासानेच लोक पश्चात्ताप करतात आणि पापांच्या क्षमेसाठी पाण्यामध्ये बाप्तिस्मा घेतात (प्रेषितांची कृत्ये २:३८). मनुष्याला विश्वासाद्वारेच पवित्र केल्या जाते (प्रेषितांची कृत्ये २६:१८). ख्रिस्ताची सुवार्ता विश्वासाद्वारेच आज्ञापालनासाठी सर्व राष्ट्रांच्या लोकांना सांगण्यात येत आहे (रोमकरास पत्र १:५). यास्तव आपण विश्वासाने नीतिमान ठरविलेले आहोत म्हणून आपल्या प्रभू येशू



ख्रिस्ताच्याद्वारे आपणास देवाबरोबर असलेल्या शांतीचा लाभ घडो (रोमकरास पत्र ५:१). विश्वास केवळ एक आहे. (इफिसकरास पत्र ४:५). विश्वासाचे रक्षण होणे आवश्यक आहे आणि ख्रिस्तीलोक विश्वासरूपी ढाल घेऊन आपल्याला वाचवितात. (इफिसकरास पत्र ६:१६). ख्रिस्ती लोकांना विश्वासात वाढणे आवश्यक आहे (फिलिप्पेकरास पत्र १:२५). पौलाने म्हटले "जर तुम्ही विश्वासात स्थिरावलेले व अढळ राहता, आणि जी सुवार्ता तुम्ही ऐकली, आकाशाखालच्या सर्व सृष्टीत जिची घोषणा झाली व जिचा मी पौल सेवक झालो आहो, तिच्या आशेपासून तुम्ही ढळला नाही तर हे होईल (कलस्सैकरास पत्र १:२३). ख्रिस्ती लोक स्थिरतेचा विश्वास दाखवितात (कलस्सैकरास पत्र २:५). पौल नेहमी थेस्सलनीकातील आपल्या भावांच्या विश्वासाला अर्थात प्रेमाच्या परिश्रमाची आठवण ठेवित होता (थेस्सलनिकाकरास पत्र १:३). ख्रिस्ती व्यक्तीच्या विश्वासाचा बचाव होणे आवश्यक आहे. म्हणून प्रभू आम्हाला परमेश्वराची शस्त्रसामुग्री धारण करायला सांगत आहे की वाईट दिवशी टिकून राहण्यासाठी समर्थ असू. सत्य, सुवार्ता, विश्वास, तारण परमेश्वराचे वचन, प्रार्थना, वाईट दिवसांसाठी लढण्यासाठी आमचे हेच शस्त्र आहे म्हणून आम्हाला वारंवार याचा उपयोग करायची आवश्यकता आहे (इफिसकरास ६:१०-१८).

• • •

आम्ही तुम्हाला विभिन्न भाषांतील सुवार्ता घोषणेच्या प्रयत्नामध्ये लांभांकित व्हावे ह्यासाठी उत्तेजन देत आहोत.

## T.V./ Radio Program/ Magazine / Bible Courses

**GRACIOUS WORD** **TAMIL**

Speakers : **Philemon & Kingsly Rajah**
T.V. Program : **Nambikki TV-** Friday 6-15 a.m.
**Tamilan TV-** Sunday 6-45 a.m.
Magazine : Kirubaiyulla Vaarthai (Monthly Tamil)
The Voice of Truth Intl. (English Qtly.)
Bible corres.Course : Basic and Advanced Bible
**Correspondence Courses (Tamil & English)**
**J.C. School Of Evangelism** : Training faithful men and women for Evangelism @ their Place

Online Bible Course@ : **www.graciousword.org.(Tamil&English)**

**God's word to the Visually Challenging People**

- The Voice of Truth International Braille Edition, Tamil& English-Free
- Braille Bible Lessons, Tamil& English-Free
- Free MP3 Player Audio Bible for Blinds, Different Languages-Free

**For more information and Bible Course, write to**

Church of Christ, Post Box 15, Arasaradi, Madurai-625016.
Tamilnadu (India) Cell : 92 4421, 4421, 92 4431 4431
Email : obey2jesus@gmail.com Visit : www.graciousword.org

---

**SATHYA VAZHI**

Speakers : **P.R. Swamy (Evangelist)**
Radio Program : Sunday to Wednesday 5.30 p.m.
Srilanka All Asia Service-25 & 49 Meter band
Magazine : Sathya Vazhi (Tamil)
Programs : Bible School & Bible Corres. Courses

**For more information write to**

**"Sathya Vazhi"**, Post Box 8405, Bengaluru - 560 084
Phone : 080-25463507 Cell : 098440 70763
Email : prsdoug@hotmail.com

**THIRUMARAI AASAN**

Speaker : **Rajanayagam**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday 7.00 a.m.
Thursday 9.30 p.m. & Saturday 7.15 a.m.
Magazine : Thirumarai Aasan (Monthly)
Tamil Qtrly Magazine : "Sathiyathin Kural" (TVOTI- Tamil)
Advanced Bible Correspondence Course Available in Tamil

**For more information write to**

**Church of Christ,** Post Box 27, Dharapuram Road,
Kangeyam - 638701 Cell : 9842730382

**THE WORD OF CHRIST**

Speaker : **B. Arjunan**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday,Saturday7.30 -7.45a.m.
Magazine : The word of Christ (Monthly)
Radio Program : SW25 & 41m (Saturday 5.30 to 5.45 p.m.)
Srilanka All Asia Service

**For more information write to**

**The Word of Christ,** Post Box 5, Batlagundu - 624206.
Dindigul Dist. Cell : 9443558041

**SATYAVANI** **TELUGU**

Speakers : **Joshua & Ricky Gootam**
T.V. Program : **Subhavartha Channel** Sunday 6.00 p.m.
**Rakshana Channel**
Wednesday 6.30 p.m. Thursday 11.00 a.m.
Satyavani T.V. Online : www.sakthitv.in
Every Wednesday & Friday at 8.00 p.m.

**For more information & Bible course write to**

Post Box 80, Kakinada, Andhrapradesh-533001.
Phone : 08842363722 E-mail : jgootam@yahoo.com

**MALAYALAM**

Speaker : **P.K. Vargheese**

T.V. Program : **Jai hind Channel**
Every Saturday 6 a.m. to 6.30 a.m.

Magazines : Bible Truth - Monthly
& Truth for Today (Bi-monthly)

**For more information & Bible course write to**

**Church of Christ,** Tampuranmukku, Trivandrum- 695 035.
Phone : 0471 - 2303378, Cell : 9447035465

**HINDI**

T.V. Program : **Shubh Sandesh Hindi Channel**
Every Sunday, Tuesday 7.00 pm to 7.30 pm

Speakers : **Sunny/ Francis/ Vinay David**

Magazine : **English Bible Teacher - Sunny David**
E-mail : sunny_davidin@yahoo.co.in
Cell : 09810896789
**Hindi Bible Teacher - Francis David,**
Email : davidfrancis53@rediffmail.com
Cell : 09911916932

Bible Courses : **Hindi & English - Vinay David**
Emai: vinay_david2002@yahoo.co.in
Cell : 09911719517

Church meets at: C.R. Park, 1st block, Near Market
No. 4, New Delhi - 110019

Sunday Worship: 11.00 a.m.

**For more information write to :**

**Church of Christ,** Post Box 3815, New Delhi - 110049

**BRALLE MAGAZINE & BRAILLE BIBLE COURSE** Available for Visually Challenging People in Tamil/English/ Telugu Languages.

Write to : **THE VOICE OF TRUTH INTERNATIONAL-BRAILLE EDITION**
P.O. Box : 15, ARASARADI, MADUARAI-625 016. TAMILNADU
Email : obey2jesus@gmail.com Ph.: 92 4421 4421

# व्हाईस ऑफ ट्रुथ इंटरनॅशनल
## फॉर्म

- मी व्हाईस ऑफ ट्रुथ (मराठी) माझ्यासाठी मागवू इच्छितो / इच्छिते. मी चार अंकासाठी वर्गणी रू. १००/- चेक / मनीऑर्डरने पाठवित आहे. माझा पत्ता खाली दिला आहे.
- मी व्हाईस ऑफ ट्रुथ (मराठी) माझा मित्र ...................... ह्याच्यासाठी मागवू इच्छितो / इच्छिते. मी चार अंकासाठी वर्गणी रू. १००/- चेक / मनीऑर्डरने पाठवित आहे. माझा पत्ता खाली दिला आहे.
- मी २५ प्रतींची वर्गणी रू. ५०० पाठवित आहे. ह्याप्रकारे पूर्ण मंडळीच्या लोकांसाठी ह्या प्रती मागवून तुम्ही प्रचार करण्यासाठी मदत करून आशीर्वाद प्राप्त करू शकता.

**कृपा करून ह्या फॉर्मला भरून चेक सोबत एका पाकीटामध्ये टाकून किंवा मनीऑर्डर सोबत खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवून द्यावे. चेक/मनीऑर्डर खाली दिलेल्या नावाने पाठवावे.**

**Amul Dayanand Bansod**
**F/5 Siyon Nagar, Near D.K.M.M. College, Lani Road,**
**Pahadsingpura, Aurangabad - 431 001 (M.S.) India**

Name ..........................................................................................
Add ............................................................................................
.....................................................................................................
City ......................... State ...................... Pin ..............................

Name ..................................................................................................

Add ..................................................................................................

..................................................................................................

City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..................................................................................................

Add ..................................................................................................

..................................................................................................

City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..................................................................................................

Add ..................................................................................................

..................................................................................................

City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..................................................................................................

Add ..................................................................................................

..................................................................................................

City .......................... State ....................... Pin ...............................

Name ....................................................................................

Add ....................................................................................

..........................................................................................

City ......................... State ...................... Pin ..............................

Name ....................................................................................

Add ....................................................................................

..........................................................................................

City ......................... State ...................... Pin ..............................

Name ....................................................................................

Add ....................................................................................

..........................................................................................

City ......................... State ...................... Pin ..............................

Name ....................................................................................

Add ....................................................................................

..........................................................................................

City ......................... State ...................... Pin ..............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..........................................................................................................

City .......................... State ....................... Pin ..............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..........................................................................................................

City .......................... State ....................... Pin ..............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..........................................................................................................

City .......................... State ....................... Pin ..............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..........................................................................................................

City .......................... State ....................... Pin ..............................